
पुणे, रविवार, ९ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 102 • वर्ष ४ थे, अंक १०२ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



खडकवासला कालव्याचे 'ड्रोन' सर्वेक्षण P3



आज फायनलचा महासंग्राम १२

# पुण्यात गुन्हेगारी घटनांचे सत्र

## अश्लील वर्तन, मारहाण, वाहनांची तोडफोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज पुणे शहर आणि जिल्ह्यात सलगतेने घडलेल्या काही गुन्हेगारी घटनांमुळे पुन्हा एकदा शहरात खळबळ उडाली. स्वारगेट मधील अत्याचारित तरुणीचे प्रकरण ताजे असताना आज शास्त्रीनगर चौकात गौरव अहुजा नावाच्या एका एका बीएमडब्ल्यू कार चालकाने मध्य धुंद अवस्थेत रस्त्यावर कार उभी करून केलेले अश्लील चाळे केल्याची घटना व्हायरल होत असताना सिंहगड रोडवर एका दाम्पत्यावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली तर त्या पाठोपाठ शास्त्रीनगर भागात वाहनांचे तोडफोड केल्याची घटना समोर आली . सलगतेने सुरू असलेल्या या गुन्हेगारी कृत्यांमुळे शहराची कायदा सुव्यवस्था परिस्थिती बिघडत चालल्याचे दिसत आहे.

पुण्यात काही दिवसांपुर्वी कल्याणीनगर भागात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेमध्ये कारने दुचाकीवरून जाणाऱ्या दोघांना उडवल्याची घटना घडली होती. या घटनेची चर्चा संपूर्ण राज्यासह देशभरात झाली. त्यानंतर आता मद्यधुंद अवस्थेमध्ये रस्त्याच्या मधोमध चारचाकी गाडी उभी करून दारूच्या नशेत तरूणांनी अश्लील चाळे केल्याची संतापजनक घटना घडली आहे.

» पान ७ वर

### रुपाली पाटील भडकल्या

● विद्येचं माहेरघर असलेल्या सुसंस्कृत पुण्यात गुन्हेगारी लोकांची विकृती वाढली आहे. BMW सारख्या गाडीतून उतरुन रस्त्यावर बाथरुम करतोय, किती निर्लज्ज आहे. यांना संस्कार नावाची गोष्टच नाहीये. कुठेही सार्वजनिक शौचालयात जाऊ शकला असता, एवढाच पैशांचा माज असेल, तर हॉटेलमध्ये जाऊ शकला असता

"माझ्या मुलाने सिग्नलवर लघुशंका केली नाही, तर माझ्या तोंडावर केली आहे... त्याच्या वर्तनाची मला लाज वाटते..." हे उद्गार आहेत मनोज अहुजा यांचे, जे स्वतः या प्रकरणात जबाबदारी स्वीकारत आहेत. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी शास्त्रीनगर पोलीस चौकीत गुन्हा नोंदवला असून, तरुणाचा शोध सुरू आहे."

**— मनोज रमेश अहुजा,** वडील

## कन्यारत्न सन्मान

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**मुंबई:** जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने बेटी बचाव बेटी पढाव कार्यक्रम व कन्यारत्न यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ.आदिती तटकरे, महिला आयोगाचे अध्यक्ष ना.रूपालीताई चाकणकर

## At a Glance

### उषा काकडे यांना विषबाधा : अनेक चर्चांना उधाण

**पुणे :** माजी खासदार संजय काकडे यांच्या पत्नी उषा काकडे या पोलिसांना गंभीर अवस्थेत आढळल्या



त्यांना तातडीने रुबी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांना व्हेज वादा झाल्याचे स्पष्ट झाले आहे त्यांनी विष पिण्याचा प्रयत्न केला की त्यांना अन्नातून विषबाधा झाली याबाबत विविध चर्चा जोर धरत आहेत. रुबी हॉलचे प्रवक्ते अली दारुवाला यांनी याबाबत माहिती दिली. सध्या उषा काकडे यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती

» पान ७ वर

### धर्मांतराला फाशी

**पुणे :** भोपाळ: मध्यप्रदेशात आता बळजबरी धर्मांतराबाबत राज्य सरकारने प्रचंड कडक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी याबाबतची घोषणा केली आहे. मोहन यादव यांनी म्हटले की, धार्मिक स्वतंत्रता अधिनियमच्या माध्यमातून आम्ही तरतूद करत आहोत की, जे धर्मांतर करवून घेततील त्यांच्यासाठी आमच्या सरकारकडून फाशीच्या शिक्षेची तरतूद केली जात आहे.

### माऊली, तुकोबारायांच्या यादीत तांबे ?

**मुंबई :** भक्ती शक्ती व्यासपीठ आणि श्रीगुरू पादुकादर्शन उत्सव समितीच्या वतीने वरळी येथे पादुकादर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पादुकादर्शन सोहळ्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराजांपासून ते श्री संत गुळवणी महाराजापर्यंतची यादी दिली आहे. मात्र संतांच्या या यादीत डॉ. बालाजी तांबे यांच्या पादुकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे संत, महात्मांच्या यादीत डॉ. बालाजी तांबे यांचे नाव कसं? असा सवाल विचारला जाऊ

» पान ७ वर

### विमा कंपन्यांनी लुटले : राजू शेट्टी

**पुणे :** शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किंमतीने माल विकावा लागत आहे, त्याला सरकारचं धोरण कारणीभूत असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. सरकारनं काही उद्योगपतींना खुश करण्यासाठी तेलावरचा आयात कर कमी केला असल्याचे राजू शेट्टी म्हणाले. सोयाबीनच्या निर्यातीचे अडथळे सरकारने दूर केले नाहीत, त्यामुळं सोयाबीनला 4800 रुपये हमीभाव असताना ते कमी किंमतीत शेतकऱ्यांना विकावे लागत

» पान ७ वर

# फडणवीसांकडून पॅचअप!

## लालपरीची सूत्र पुन्हा सरनाईकांकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री आणि एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय प्रताप सरनाईक यांची नियुक्ती झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजय अशर यांची मित्रा संस्थेतून झालेली गच्छंती म्हणजे फडणवीस आणि शिंदे यांच्याच मोठा दुरावा निर्माण झाल्याची चर्चा सुरू होती. मात्र प्रताप सरनाईक यांच्या नेमणुकीमुळे या दोन्ही नेत्यांमध्ये कोणताही दुरावा नसल्याचे दिसून येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आपल्यात कोणताही दुरावा नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जाहीरपणे स्पष्ट केले. मात्र या दोन्ही नेत्यांमध्ये संवाद नसून दुरावा वाढण्याच्या बातम्यांची सुरुवात एका महिन्यापूर्वी झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची नियुक्ती एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर केली होती. ही नियुक्ती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रताप सरनाईक या दोघांसाठी एक मोठा धक्का मानली जात होती. मात्र एका महिन्याच्या आत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला निर्णय मागे घेत प्रताप सरनाईक यांची नियुक्ती महामंडळाच्या अध्यक्षपदी केली आहे.

बहुतांश वेळेस राज्याचे परिवहन मंत्री हेच एसटी महामंडळाचे अध्यक्ष राहिले आहेत. 2014 ते 2019 मध्ये दिवाकर रावते हे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात अनिल परब यांच्याकडे मंत्रिपदची आणि अध्यक्षपदाची जबाबदारी होती. हीच परंपरा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना कायम ठेवण्यात आली. त्यावेळी एकनाथ शिंदे हेच राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष होते. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी या परंपरेला ब्रेक दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मुख्य अप्पर सचिव संजीव सेठी यांच्याकडे एसटी महामंडळाचे अध्यक्षपद दिल्यानं राजकीय वर्तुळात

» पान ७ वर

### काँग्रेसचे निम्मे नेते भाजपला मिळालेले : राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अहमदाबाद: राहुल गांधी गुजरात दौऱ्यावर आहेत. आपल्या दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी त्यांनी 9 तासांत तब्बल 5 बैठका घेतल्या. अहमदाबादमध्ये दोन हजार कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना राहुल गांधी म्हणाले, 'काँग्रेसच्या नेत्यांमध्ये दोन प्रकारचे लोक आहेत. एक जे काँग्रेसच्या विचारधारेशी जोडलेले आहेत. ते जनतेसोबत आहेत. तर, दुसऱ्या प्रकारचे नेत्यांना जनतेशी काहीच देणंघेणं नाही. त्यातील निम्मे भाजपला सामील आहेत.भाजपसाठी काम करणाऱ्यांना पक्षाबाहेर काढणार.' 'माझी पहिली जबाबादारी आहे की काँग्रेसमध्ये जे दोन ग्रुप आहेत

» पान ७ वर

# महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात विराट मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धम् शरणम् गच्छामि ॥ धम्मम् शरणम् गच्छामि॥ संघम् शरणम् गच्छामि .. च्या स्वरात शांततेचा संदेश देत महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात बौद्ध अनुयायांचा विराट मोर्चा काढण्यात आला. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती, पुणेच्या वतीने आयोजित या महामोर्चात लाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी झाले होते.

बिहार मधील बूद्धगया येथे तथागत भगवान गौतम बुद्धांचे हजारो वर्षापासूनचे विहार आहे. मात्र त्याचा ताबा बौद्धेतर विशेषता ब्राम्हणी धर्मपंडितांकडे आहे. या गोष्टीचा जगभरातून निषेध होत असून



महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हे बौद्ध अनुयायांच्या देखरेखी खाली कार्यान्वित करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. सध्या बुद्धगया येथे जगातील बौद्ध भिख्खूंचे प्रतिनिधी आंदोलन करत आहेत. याच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आज बालगंधर्व ते अलका चौक दरम्यान बौद्ध समाजाचा महामोर्चा काढण्यात आला.

भदंत नागघोष महाथेरो, भंते राजरत्न, भंते बुद्धघोष थेरो, भंते धम्मधर थेरो.भंते पय्यारक्खित.भंते धम्मानंद, भंते यश, भंते प्रियदर्शी भंते सुमंगल, भंते राहुल आदी बौद्ध भिख्खूंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या महामोर्चातलाखोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी

» पान ७ वर

# धस समर्थक 'खोक्या'च्या घरी हरणांचे जाळे



**बीड :** तपास पथकाने धस समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सतिश भोसले उर्फ खोक्या यांच्या घराची झडती घेतली आहे. या तपासादरम्यान मोर आणि हरिण यांसारख्या संरक्षित प्राण्यांची शिकार करण्यासाठी वापरण्यात येणारे जाळे जप्त करण्यात आले आहे.

पोलिस आणि वन विभागाच्या संयुक्त कारवाईत ही कारवाई करण्यात आली असून, शिकारी प्रकरणाशी संबंधित आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### मोहिते पाटील यांच्या विवाह सोहळ्यास भाजपवाल्यांची पाठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अकलूज :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे नातू आणि भाजप आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचे सुपुत्र विश्वतेजसिंह मोहिते पाटील यांचा शाही विवाह सोहळा अकलूजमध्ये पार पडत आहे. या विवाह सोहळ्यासाठी खासदार शरद पवार, खासदार शाहू महाराज छत्रपती, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील, रासपचे महादेव जानकर यांच्यासह जिल्ह्यातील आमदार उपस्थित आहेत. याशिवाय क्रीडा राज्यमंत्री दत्तात्रय भरणेही उपस्थित आहे. मात्र, या विवाह सोहळ्याकडे भाजपच्या आमदार खासदार मंत्र्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी पाठ फिरवल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.



**अकलूज** विश्वतेजसिंह मोहिते यांच्या विवाह सोहळ्यात शुभेच्छा देताना उपस्थित आ. अभिजीत पाटील, वरपिता आ. रणजितसिंह मोहिते आणि नवदाम्पत्य

### जयंत पाटलांचा पडळकरांवर पलटवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सांगली :** भारतीय जनता पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत टीकेची तोफ डागली होती. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चौकशीच्या मागणीच्या निमित्ताने पडळकरांनी जयंत पाटील यांची साखर कारखाने खरेदी काढत निशाणा साधला होता. त्यावर माजी मंत्री जयंत पाटील यांनी पलटवार करताना 'एखाद्याने भुंकायचेच ठरवले असेल तर तो भुंकत राहतो. आपण आपल्या चालीने चालायचं असतं' या शब्दांत हल्लाबोल केला आहे.

### दिल्लीत महिन्याला अडीच हजार रुपये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** केंद्र सरकारने महिलांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. या योजनांमध्ये महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाते. केंद्रासोबतच विविध राज्य सरकारनेदेखील महिलांसाठी योजना राबवल्या होती. महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण योजना राबवली आहे. त्यानंतर आता दिल्ली सरकारनेही महिला समृद्धी योजना राबवली आहे.

दिल्ली सरकारच्या महिला समृद्धी योजनेच्या रजिस्ट्रेशनची सुरुवात महिला दिन म्हणजेच आजपासून झाली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी महिलांना २५०० रुपये देऊ, असं भाजपने जाहिरनाम्यात सांगितले होते. त्यामुळे आता

» पान ७ वर

# महिला सुरक्षारक्षकांचा बसस्थानकावर ‘खडा पहारा’...!

सुरक्षा

"पुणे विभागातील मोठ्या एसटी स्थानकावर महिला सुरक्षारक्षक नेमण्यात येणार असून, त्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यानुसार स्वारगेट एसटी स्थानकात सहा महिला सुरक्षारक्षक आजपासून हजर झाले असून, शिवाजीनगर आणि बारामती येथील स्थानकांतही महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे."

**— प्रमोद नेहुल,** विभागीय नियंत्रक, पुणे एसटी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिलांनी आतापर्यंत सर्वच क्षेत्रात आघाडी घेतली आहे; ही भरारी घेताना विविध महिलांनी वेगवेगळी क्षेत्रे निवडली असून त्यामध्ये कौतुकास्पद कामगिरी केली आहे. स्वारगेट येथे घडलेल्या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आता एसटीच्या सर्व बसस्थानकांवर महिला सुरक्षारक्षक गस्त घालणार असून त्या खडा पहारा ठेवणार आहेत; त्यामुळे महिलांची सुरक्षा आता महिला सुरक्षारक्षकांच्या हाती देण्यात आली आहे, विशेष म्हणजे त्याची अंमलबजावणी आज महिला दिनाच्या दिवशीच करण्यात आली आहे.





स्वारगेट एसटी स्थानकावर महिला मदत केंद्रासह आता प्रवासी महिलांच्या सुरक्षिततेसाठी महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. जागतिक महिला दिनाला महिलांची नेमणूक करण्यात आली असून, त्या शुक्रवारीस्वारगेट स्थानकावर गस्त घालताना दिसल्या.

स्वारगेट स्थानकात घडलेल्या बलात्काराच्या दुर्दैवी घटनेनंतर एसटी स्थानकातील प्रवासी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न समोर आला. या घटनेने एसटी प्रशासनही खडबडून जागे झाले आणि मोठ्या स्थानकावर महिलांच्या सुरक्षिततेसाठी महिला सुरक्षारक्षक नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार स्वारगेट एसटी स्थानकात शुक्रवारी सहा महिला सुरक्षारक्षक तैनात झाल्या आहेत.

महिला दिनाला या महिला सुरक्षारक्षकांनी स्वारगेट स्थानकात गस्त घालून महिला प्रवाशांना अडीअडचणींबाबत विचारपूस केली. याशिवाय महिलांसाठी स्थानकातील कंट्रोल रूमजवळ सुरू केलेल्या महिला मदत केंद्रामध्ये एका महिलेची नेमणूक केली असून, या केंद्रामध्ये प्रवासी महिला आपल्या अडचणी, समस्या यासह तक्रारी मांडू शकतील. त्यांनी स्थानकावर विनाकारण फिरणाऱ्यांना बाहेर काढले. महिला प्रवाशांची विचारपूस करत त्यांना आश्वस्त केले. त्यामुळे दिवसभर स्थानकावर महिला सुरक्षकांचा दरारा दिसून आला. हाच दरारा कायम राहावा आणि महिला प्रवाशांची काळजी घ्यावी, अशा भावना महिला प्रवाशांनी व्यक्त केल्या.

#रा



## 'रामपर्व' च्या काव्यरचनांनी रसिक मंत्रमुग्ध

**पुणे :** 'अनुराग जाहला सीतेला', 'राम जानकी मिलन झाले', 'चित झाली मुंड्या सारी', 'झेप घेतली हनुमानानी', 'सावळी ती कांती गोजिरे ते रूप' या रचना सादर करीत रामायणातील ज्या पात्रांवर आणि प्रसंगांवर आजपर्यंत काव्य झाले नाही, अशा प्रसंगावर आधारीत नव्या काव्यरचना ऐकण्याची संधी पेशवेकालीन तुळशीबाग राम मंदिरात पुणेकरांना मिळाली. कलाकारांनी सादर केलेल्या रचना ऐकून रसिक मंत्रमुग्ध झाले.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग यांच्या वतीने श्रीमंत नारो आप्पाजी तुळशीबागवाले यांच्या पुण्यतिथी निमित्त तुळशीबाग राम मंदिरात 'राम पर्व' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता.

अमित गोखले यांनी नवीन काव्य निर्मिती केली असून त्याला हेमंत आठवले आणि जान्हवी गोखले यांनी संगीतबद्ध केले होते. तबल्यावर केदार तळणीकर, तालवाद्यावर अवधूत धायगुडे आणि व्हायोलिनवर वेधा पोळ यांनी उत्तम साथ केली.



## महिला दिनानिमित्त डब्ल्यूपीयूत वृक्षारोपण

**पुणे :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या सिव्हिल इंजीनियरींग विभागच्या वतिने विद्यापीठात वृक्षारोपण करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सुरभी राजदान, डॉ. शांतीनी बोकिल, डॉ. सुमंत शिंदे, डॉ. अपर्णा नागुरे, डॉ. रोहित सालगुडे, डॉ. मिरा रेड्डी, डॉ.लिप्सा मिश्रा, रामचंद्र इंगोले, बालाजी कदम, श्री. अनंत नागरगोजे, बाबासाहेब नागरगोजे, मृणमयी बागल व शिवानी शिंदे यांच्या सहित अनेक महिला शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.



## पोस्ट ऑफिसमधील महिलांचा सन्मान

**पुणे :** संपूर्ण टपाल व्यवस्थापनाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या डेक्कन जिमखाना पोस्ट ऑफिस मधील महिला भगिनींचा सन्मान विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्ट आणि हिंद शक्ती फाउंडेशन च्या वतीने करण्यात आला.

महिला दिनानिमित्त डेक्कन जिमखाना येथील पोस्ट ऑफिस मध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कथक नृत्यांगना पं. मनीषा साठे यांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर, समर्थ युवा फाउंडेशनच्या संचालिका सरोज राजेश पांडे, सब पोस्टमास्तर कैलास मोरे, असिस्टंट सब पोस्टमास्तर स्वाती वाळुंजकर, मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय फंड, कार्याध्यक्ष सुनील पांडे, हिंद शक्ती फाउंडेशनचे संचालक अभिजीत मोडक, अक्षय शहाणे, मंडळाच्या महिला अध्यक्ष, गौरी माळी, कार्यकर्त्या वैशाली जोगळेकर, किमया ढेकणे, प्रिया रानडे, ऋतुजा दाणी, केतकी देशपांडे, नीलिमा जोशी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा कुराडे यांनी केले तर अर्चना सोनवणे यांनी आभार मानले.

## सन्मान महिलांच्या धार्मिकतेचा...!



पुणे पेशवेकालीन श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट च्या वतीने भजनी मंडळातील महिलांचा सन्मान करण्यात आला.लायन्स क्लब पुणे सिटी आणि राष्ट्रीय कला अकादमीच्या सहकार्याने टिळक चौकातील श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## भजनी मंडळातील महिलांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भजन हे केवळ भक्तिसंगीत नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे. भजनी मंडळातील महिलांची भूमिका ही केवळ गायनापुरती मर्यादित नसून, त्या समाजाच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात, अशी भावना व्यक्त करीत पेशवेकालीन श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट च्या वतीने भजनी मंडळातील महिलांचा सन्मान करण्यात आला.

लायन्स क्लब पुणे सिटी आणि राष्ट्रीय कला अकादमीच्या सहकार्याने टिळक चौकातील श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रीफळ, गुलाबपुष्प आणि साडीचोळी देऊन महिलांचा सन्मान करण्यात आला. पासोड्या विठोबा मंदिराचे प्रमुख विश्वस्त रविंद्र फटाले यांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष दिलीप बांदल, कोषाध्यक्ष दिपक थोरात, राष्ट्रीय कला अकादमीच्या संचालिका रोमा लांडे, अमर लांडे, सचिव नरेंद्र गाजरे, सहसचिव बाळासाहेब ताठे, उत्सव प्रमुख महेश अंबिके, स्वप्निल काळभोर, विनोद मणियार, लायन्स क्लबचे बजरंग आकडे उपस्थित होते.

रोमा लांडे, दिलीप बांदल यांनी मनोगत व्यक्त केले. अमर लांडे यांनी आभार मानले.

# खडकवासला कालव्याचे 'ड्रोन' सर्वेक्षण

### पर्यावरण खात्याची मान्यता अंतिम टप्प्यात; कालवा होणार भुयारी

खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालव्याचा किलोमीटर १ ते ३४ लांबीचा भाग पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून जातो. पुणे शहराची होणारी वाढ, झोपडपट्टी, अतिक्रमणे व पर्यायाने होणारे जलप्रदूषण, जलनाश यामुळे कालव्याची हानी झाली आहे. त्यामुळे कालव्याच्या वाहनक्षमतेत झालेली घट टाळण्यासाठी नवीन मुठा उजवा कालव्याच्या किलोमीटर १ते ३४ मधील लांबीसाठी पर्यायी खडकवासला ते फुरसुंगीपर्यंत बोगदा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे २.१८ टीएमसी पाण्याची बचत होणार आहे. यातून सिंचनासाठी, तसेच बिगर सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे सिंचनापासून वंचित राहणारे तीन हजार ४७१ हेक्टर इतके क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे.

"ही जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात आली नाही. त्याबाबत प्राथमिक चर्चा सुरु आहे, ही जागा ताब्यात आल्यानंतर त्याचा कशा पद्धतीने उपयोग करावा, या ठिकाणी सायकल ट्रॅक, रस्ता, उद्यान अशा कोणत्या सुविधा उपलब्ध करून देता येतील ? याचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणून सर्वेक्षण केले जाणार आहे."



**- प्रशांत वाघमारे,** शहर अभियंता,पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातून जाणारा खडकवासला ते फुरसुंगी या कालव्याचे 'ड्रोन'द्वारे सर्वेक्षण केले जाणार आहे. हा कालवा भुयारी केला जाणार असुन, कालव्याची जागा महापालिकेच्या ताब्यात येण्याची शक्यता गृहीत धरून हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.

खडकवासला प्रकल्पातील खडकवासला धरणापासून फुरसुंगीपर्यंत करण्यात येणाऱ्या बोगद्याचे सुरू होण्याची शक्यता आहे. सध्या या बोगद्याचे काम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली पर्यावरण मान्यता घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्याचबरोबर बांधकाम आराखडा स्थाननिश्चितीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा याचे कामकाज सुरू असून, ही सर्व कामे खासगी ठेकेदारांच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत.

खडकवासला प्रकल्पाच्या नवीन मुठा उजवा कालव्याच्या फुरसुंगी बोगदा प्रकल्पाला गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. या प्रकल्पासाठी दोन हजार १९० कोटी ४७ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या बोगद्यामुळे पुणे परिसरास सिंचन आणि पिण्यासाठी अधिकचे पाणी उपलब्ध होणार आहे.

या पार्श्वभुमीवर कालव्याची जागा सध्या जलसंपदा विभागाकडे आहे. ही जागा महापालिकेच्या



ताब्यात देण्यासंदर्भात चर्चा सुरु आहे. ही जागा महापालिकेच्या ताब्यात आल्यानंतर या जागेचा उपयोग कोणत्या कामासाठी करायचा ? या ठिकाणी काय करता येईल, तसेच अतिक्रमण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने या कालव्याच्या जागेचे व जवळील भागाचे 'ड्रोन' द्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. या प्रस्तावानुसार मोनार्च सव्हेअर अँड इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा. लि. या कंपनीला हे काम देण्यात आले आहे. या सर्वेक्षणासाठी सुमारे एक कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे, यावर्षीच्या अंदाजपत्रकात या कामासाठी पन्नास लाख रुपयांची तरतुद असुन, पुढील अंदाजपत्रकात उर्वरीत तरतुद केली जाणार आहे.

**असा होणार सर्वेक्षणाचा फायदा**

- बोगद्यामुळे सिंचन आणि पिण्यासाठी अधिकचे पाणी उपलब्ध होणार
- प्रकल्पासाठी २ हजार १९० कोटी ४७ लाख रुपयांची तरतूद
- ड्रोन सर्वेक्षणासाठी एक कोटी रुपये खर्च अपेक्षित
- बांधकाम आराखडा आणि अन्य यंत्रणेचे कामकाज सुरु
- जागा निश्चितीसाठी पर्यावरण विभागाशी सकारात्मक चर्चा
- प्रकल्पामुळे २. १८ टीएमसी पाण्याची होणार बचत
- सर्व कामे खासगी ठेकेदारांच्या माध्यमातून

## महिला कर्मचाऱ्यांना पालिकेचा वसूलीचा धडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेत प्राथमिक विभागातील शिक्षणाधिकारी, समग्र शिक्षा प्रकल्प अधिकारी महिला आहेत. असे असतानाही महिला कर्मचाऱ्यांकडून ही रक्कम घेतली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.ज्या नोकरदार महिलांचे महिन्याला वेतन २५ हजार रुपयांपेक्षा कमी आहे. त्यांच्याकडून व्यावसायिक कराची (प्रोफेशनल टॅक्स) रक्कम कपात करू नये,' या आदेशाकडे दुर्लक्ष करून पुणे महापालिकेचा शिक्षण विभाग गेल्या दोन वर्षांपासून महिला कर्मचाऱ्यांकडून ही रक्कम घेत आहे.

दोन वर्षांपूर्वी २०२३ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे अंदाजपत्रक सादर करताना नोकरदार महिलांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. 'ज्या महिला कर्मचाऱ्यांचे वेतन २५ हजार रुपयांपेक्षा कमी आहे. त्यांच्याकडून व्यावसायिक कराची वर्षाला घेतली जाणारी अडीच हजार रुपयांची रक्कम घेतली जाणार नाही,' असे फडणवीस यांनी जाहीर केले होते.त्याबाबतचा अध्यादेश राज्यातील महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच सरकारी कार्यालयांना पाठविण्यात आला आहे. महिलांबरोबरच अपंग व्यक्तींचीदेखील या करातून सुटका करण्यात आली आहे. अपंग व्यक्तींच्या वेतनातून हा कर कापला जात नाही.

महिलांच्या वेतनातून मात्र हा कर कापला जात आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये आदेशाचे पालन होत असून, कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या आणि २५ हजारांपेक्षा कमी वेतन असलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून व्यावसायिक कराची कोणतीही रक्कम कापली जात नाही.

पुणे महापालिकेतील समग्र शिक्षण अभियानात ६६ कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये २५ विशेष शिक्षक आहेत, ज्यांचे मसिक वेतन २५ हजारांपेक्षा कमी आहे. यामध्ये महिला विशेष शिक्षकांची संख्या २१ आहे. यापैकी तीन महिला शिक्षक अपंग आहेत. त्यांचा व्यावसायिक कर राज्य आदेशानुसार व्यवसायकर कापला कापला जात नाही. इतर महिला कर्मचाऱ्यांचा कर मात्र कापला जात आहे.

सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर म्हणाले, राज्य शासनात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना राज्य सरकारचे आदेश महत्त्वाचे वाटत नाहीत, हे यावरून दिसते. सरकारच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर महापालिका आयुक्तांनी कारवाई करून त्यांच्याकडून खुलासा घेतला पाहिजे. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे जो भुर्दंड या महिला कर्मचाऱ्यांना बसला आहे.

## कुटुंब व्यवस्था आणि मानसिक आरोग्य जपावे -पांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्नेहालय विश्वस्त संस्था आणि नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेले "मोफत मार्गदर्शन केंद्र" हे अगदी योग्य वेळी सुरु करण्यात आले आहे, सध्या समाजात खूप अस्वस्थता आहे आणि अश्या वेळी कुटुंब व्यवस्था आणि मानसिक आरोग्य जपणे हे खूप महत्वाचे आहे असे भाजपा चे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे म्हणाले.

आज त्यांच्या हस्ते जागतिक महिला दिन आणि मंजुश्री खर्डेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत मानसिक आरोग्यासंबंधी मार्गदर्शन, वैयक्तिक व कुटुंब समुपदेशन,विवाहपूर्व व विवाहोत्तर समुपदेशन, व्यसनमुक्ती, रस्त्यावरील स्क्रीझोफ्रेनिक मनोरुग्ण व्यक्तींसाठी मार्गदर्शन अश्या सर्व प्रकारच्या समुपदेशनासाठी च्या केंद्राचे उदघाट्न करण्यात आले. दर गुरुवारी सकाळी ११ ते ४ कर्वेनगर येथील रमांबिका मंदिराजवळील शक्ती ९८ चौकातील "दिव्यांग आधार केंद्र" येथे ज्योती एकबोटे ह्या मोफत मार्गदर्शन व समुपदेशन करणार असल्याचे खर्डेकर यांनी सांगितले. यावेळी भाजपाचे प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर,नगरसेवक जयंत भावे,प्रभाग अध्यक्ष एड. प्राची बगाटे,श्रीजा ठाकूर,गौरीताई करंजकर, कल्याणी खर्डेकर,डॉ. हिमांशू परांजपे, डॉ. कांचन परांजपे इ मान्यवर उपस्थित होते.



पुणे जागतिक महिला दिन आणि मंजुश्री खर्डेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत मानसिक आरोग्यासंबंधी मार्गदर्शन, वैयक्तिक व कुटुंब समुपदेशन,विवाहपूर्व व विवाहोत्तर समुपदेशन,व्यसनमुक्ती,रस्त्यावरील स्क्रीझोफ्रेनिक मनोरुग्ण व्यक्तींसाठी मार्गदर्शन अश्या सर्व प्रकारच्या समुपदेशनासाठी च्या केंद्राचे उदघाट्न करण्यात आले

# अनोख्या सन्मानाने महिला स्वच्छता कर्मचारी भारावल्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिला दिनी विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान केला जातो, परंतु हा सन्मान करताना स्वच्छता कामगार महिला आणि शालेय पोषण आहाराचे वाटप करणार्या महिलांचा सन्मान करण्याचा अनोखा उपक्रम खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयाने राबवून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला असून त्यांच्या या कामगिरीबद्दल विविध स्तरातून या शाळेचे कौतुक होत आहे. या अनोख्या सन्मानाने या महिला स्वच्छता कर्मचारीही भारावून गेल्या

खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयात जागतिक महिलादिन संस्था अध्यक्ष रामभाऊ मोझे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे,संस्था सदस्य श्रीमती अलका पाटील मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला. विद्यालयाने या वर्षी मुलांमध्ये महीलांप्रती आदर भाव निर्माण व्हावा म्हणून दररोज शाळेतील कचरा जमा करून,कचरा गाडीमध्ये टाकण्यासाठी घेऊन जाणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचारी श्रीमती वन्नम्मा तलवार,शाळेतील मुलां पैकी प्रातिनिधिक स्वरूपात भाजीपाला विक्री करून मुलांचे शिक्षण करणाऱ्या वेदांत सूर्यवंशी या विद्यार्थ्याची आई सुमन सूर्यवंशी,तसेच दररोज मधल्या सुट्टीत आईच्या मायेने शालेय पोषण आहार चे वितरण करणाऱ्या अंबिका रजपूत, स्वाती कुलकर्णी ,शाळेच्या शिक्षकेतर महिला कर्मचारी हिराबाई मुरकुटे या आदर्श मातांचा ,त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.शाळेतील मुलींनी आजपर्यंत ऐतिहासिक काळापासून ते सध्याच्या आधुनिक काळापर्यंत उत्तम कार्य व संस्कार करणाऱ्या कर्तुत्ववान महिलांच्या व्यक्ती रेखा साकारल्या.

या मध्ये राजमाता जिजाऊ,झाशीची राणी, हिरकणी ची शौर्यगाथा, क्रांतिज्योती सावित्री बाई फुले,अंतराळवीर कल्पना चावला ,इंदिरा गांधी ,लता मंगेशकर, आशा भोसले , पहिल्या महिला पोलिस अधिकारी किरण बेदी इत्यादींच्या व्यक्ती रेखा साखरून त्यांच्या कार्याची माहिती देण्यात आली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे म्हणाले की या पुढे महीला दिनानिमित्त या कर्तृत्ववान महीलांबरोबरच आमच्या संस्थेत शिकनाऱ्या, व शालेय पातळीवर जिल्हा, राज्य,राष्ट्रीय कब्बडी स्पर्धेत अनेक पदके मिळविणारी, व सध्या "भारताचे महिला कबड्डी संघाचे कर्णधारपद भूषवणाऱ्या कर्णधार कु. प्रियंका इंगळे व कुस्ती खेळामध्ये सलग तीन वर्ष महिला कुस्ती स्पर्धेत "महाराष्ट्र केसरी" पदक मिळवणाऱ्या भाग्यश्री फंड या कर्तबगार मुलींचे नाव कायम घेण्यात येईल ,या वेळी शिक्षिका बिना साळुंखे , विद्या कव्हेकर यांनी महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमांचे सूत्र संचलन विद्यालयातील विद्यार्थीनीं कु. श्रावणी यादव व अक्षदा ठोंबरे यांनी केले.

# जगाचे आरोग्य महिलांच्या हाती

## पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** आरोग्य हीच खरी संपत्ती असून कुटुंबाचे व पर्यायाने जगाचे आरोग्य तमाम महिला वर्गाच्या हाती आहे. असे प्रतिपादन आरोग्यम् धनसंपदाच्या आरोग्य प्रशिक्षक प्रतिक्षा महाडिक यांनी केले. येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात महिला समन्वय कक्ष व प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिलांसाठीच्या आरोग्य तपासणी शिबिरात प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी बोऱ्हाडे हे होते.

त्या पुढे म्हणाल्या की,महिलांच्या आरोग्याचे सहा महत्वाचे दुवे आहेत यात काय खाता, कसे खाता, व्यायाम कसा करता, झोप किती घेता, भावना व्यक्त कशा करता व सभोवताली वातावरण कसे आहे हे आरोग्याचे सहा स्तंभ जर चांगले असतील तर महिलांचे आरोग्य चांगले राहते यातील एक स्तंभ जरी कमकुवत झाला तरी महिलेच्या व पर्यायाने कुटुंबाच्या आणि एकूणच जगाच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.प्रत्येक महिलेने स्वतःसाठी किमान एक तास तरी वेळ काढला पाहिजे. योग्य आहार - विहार हीच आरोग्याची खरी गुरुकिल्ली आहे

यावेळी व्यासपीठावर आरोग्य प्रशिक्षक विकास महाडिक,कोमल सावंत,महिला कक्ष समन्वयक प्रा. सुजाता गायकवाड, प्रा. प्रबोधिनीच्या प्रा. प्रणिता फडके आदी उपस्थित होते अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी महिला या देशाचे भवितव्य आहेत, म्हणून त्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच देशाचे भवितव्य उज्वल राहील असे प्रतिपादन केले.

यावेळी कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या सर्व महिला प्राध्यापक व विद्यार्थिनी यांची सर्वंकष आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याचा लाभ शंभरहून अधिक विद्यार्थिनींनी घेतला.

प्रास्ताविक प्रा. सुजाता गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.मेघना भंडलकर यांनी केले व शेवटी आभार प्रा. गौरी ताकवणे यांनी मानले.



शिक्रापूर ता. शिरुर येथे रस्त्याचे कडेला आढळलेला बिबट्याचा बछडा ताब्यात घेताना वनविभाग रेस्क्यू टीम.

## शिक्रापुरात दुरावलेल्या बिबट बछडयाची आईशी भेट

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील वाबळेवाडी येथे हिवरे रोड लगत आईपासून दुरावत रस्त्यावर आलेल्या बिबट बछडयाची त्याच्या आईशी भेट घडवून आणण्यात वनविभागाच्या रेस्क्यू टीमला यश आले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील वाबळेवाडी येथे हिवरे रोड लगत हॉटेल मनाली जवळ एक बिबट्याचा बछडा रस्त्याचे कडेला आढळून आल्याने नागरिकांनी रस्त्याचे कडेला मोठी गर्दी केली, याबाबतची माहिती शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार किशोर तेलंग व अंकुश चौधरी यांनी निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व शिरुर वनविभाग रेस्क्यू टीमचे शेरखान शेख यांना देताच शेरखान शेख , शुभम वाघ, अमोल कुसाळकर यांनी सदर ठिकाणी धाव घेत बिबट्याच्या बछड्याला ताब्यात घेतले, यावेळी दत्तात्रय धुमाळ, दिलीप धुमाळ, विशाल पलांडे यांसह आदी उपस्थित होते, दरम्यान याबाबतची माहिती वनपाल गौरी हिंगणे व वनरक्षक प्रमोद पाटील यांना देत माणिकडोह बिबट निवारण केंद्राचे डॉ. महेंद्र ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाछडयाची त्याच्या आईशी पुनर्मिलनची कार्यवाही करण्यात आली, त्यांनतर दुसऱ्या दिवशी सकाळच्या सुमारास पाहणी केली असता बिबट्याची मादी बछड्याला घेऊन गेल्याने बछड्याचे आईशी पुनर्मिलन झाल्याचे दिसून आले.



## राष्ट्रीय दंतचिकित्सक दिनानिमित्त दंत तपासणी

**इंदापूर :** राष्ट्रीय दंतचिकित्सक दिनानिमित्त शहा ग्लोबल स्कूलमधील ५२ विद्यार्थ्यांची दातांची तपासणी करण्यात आली.वजन, उंची ही पहाण्यात आली. बाल दंतरोग तज्ज्ञ डॉ.सुश्मिता शहा यांनी उपस्थित बालक व त्यांच्या पालकांना दंतरोगांची माहिती दिली. ते होवू नयेत यासाठी कोणती खबरदारी घ्यावी याची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या सहकारी डॉ.नाहिद शेख यांनी ही बालकांची तपासणी केली. कल्याणी यादव यांनी या उपक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी अंगद शहा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

# सेवाधामच्या विशेष विद्यार्थ्यांच्या भेटीने अमोल कोल्हे भारावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप ता. शिरुर येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी नुकतीच भेट दिली असून यावेळी विशेष विद्यार्थ्यांच्या भेटीने खासदार डॉ. अमोल कोल्हे भारावून गेल्याचे दिसून आले.

पिंपळे जगताप ता. शिरुर येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी नुकतीच भेट देत विशेष विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधांची पाहणी केली यावेळी सेवाधामचे मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली, दरम्यान सेवाधामच्या विशेष विद्यार्थ्यांनी मावळ्यांची वेशभुषा साकारत डॉ. अमोल कोल्हे यांचे केले यावेळी कर्णबधिर विद्यार्थिनींनी सादर केलेले शिवकन्या या सामुहिक नृत्याने सर्वांना थक्क केले. याप्रसंगी सेवाधाम विद्यालयाचे संस्थापक सुभाष कट्यारमल, मुख्याध्यापक पवन कट्यारमल, अधिक्षिका भाग्यश्री चिलात्रे, सचीन दरेकर, जयसिंग तिखे, कचरुनाना वाजे, तेजस झोडगे, प्रतिक डोके यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते. तर यावेळी बोलताना आयुष्यात पहिल्यांदा आज मी निशब्द झालो, दिव्यांग मुलांना सन्मानाने जीवन जगण्याची, जीवनाचा आनंद घेण्याची संधी या विद्यालयाच्या माध्यमातून मिळाली असल्याचे सांगत लहानग्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य मला जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट वाटते असे सांगत सलग २१ वर्षे जीवाच रान करणाऱ्या सुभाष कट्यारमल यांचे विशेष मुलांसाठी असलेले सेवाव्रती प्रेरणादायी असल्याचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले, यावेळी मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांनी सर्वांचे आभार मानले.



पिंपळे जगताप ता. शिरुर येथील सेवाधाम निवासी विद्यालयला भेट देताना खासदार डॉ. अमोल कोल्हे.

## बाल विकास मंदिर शाळेत महिला दिन उत्साहात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शाळेतील महिला शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी, महिला दिनाची माहिती राणी गिरमे यांनी उपस्थितांना दिली.

मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना गुलाबाचे रोप भेट देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शाला समितीचे अध्यक्ष ॲड सागर नेवसे, महामात्र सुधीर भोसले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी, मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे, मेघा जांभळे , मंजुषा चोरामले इतर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी जगताप यांनी केले.

पान १ वरून

## फडणवीसांकडून पॅचअप!

सर्वांच्याच भुवया उंचावल्या होत्या. तसेच मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे फक्त नावापुरतंच परिवहन खातं राहणार अशी चर्चाही जोर धरू लागली होती. पण शुक्रवारी मध्यरात्री अचानक सूत्रे फिरली. मुख्यमंत्र्यांनी एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा निर्णय मागे घेतला. सरनाईक यांच्या नियुक्ती पत्रावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सही केल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे. आता अधिकृतरित्या ही माहिती कधी सांगितली जाईल याची प्रतीक्षा आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर काहीच दिवसांत एसटीच्या बस प्रवासात 14.95 टक्क्यांनी वाढ करण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं होतं. त्यानंतर दरवाढीवरुन राज्यभरात प्रवाशांची तीव्र नाराजीची लाट उसळली होती. तसेच विरोधकांनीही सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता. एसटीमध्ये मिळणाऱ्या सवलतीवरून केलेला वक्तव्य देखील चांगलं चर्चेत आलं होतं.

एसटी महामंडळाचे अध्यक्षपद आयएएस अधिकाऱ्याकडे दिल्यानंतर खऱ्या अर्थाने देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात दुरावा निर्माण झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या होत्या. त्यानंतर फडणवीसांनी एकनाथ शिंदे यांच्या काळात दिल्या गेलेल्या अनेक कामांना स्थगिती दिली होती. त्यातच एमएमआरडीए मध्ये देखील घोटाळा झाल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात अजिबात समन्वय नसून दोघांमध्ये वाद असल्याचं विरोधकांकडून वारंवार सांगितले जात होते. मात्र फडणवीस यांनी एसटी महामंडळाचे अध्यक्ष पद पुन्हा प्रताप सरनाईक यांना दिल्याने एका झटक्यात दोघांमधील दुरावा संपल्याचे मूकपणे जाहीर केले आहे.

## उषा काकडे...

रुग्णालयाकडून देण्यात आली आहे. दुपारी ४ च्या सुमारास पोलिसांना श्रीमती उषा काकडे या गंभीर अवस्थेत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वरिष्ठांनी तात्काळ माहिती बाबत खात्री करण्याच्या सूचना दिल्यानंतर, एक टीम ४ वाजता त्यांच्या राहत्या घरी पोहोचली. काकडे अस्वस्थ अवस्थेत आढळल्या. तत्काळ त्यांना त्यांच्या खाजगी वाहनात केअरटेकर व नोकरांसह बसवून रुबी हॉल क्लिनिकमध्ये उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांच्या माहितीनुसार श्रीमती काकडे यांची प्रकृती स्थिर आहे. सदर प्रकरणावर लक्ष ठेवले जात असून, आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

## विमा कंपन्यांनी लुटले

**(पान १ वरुन) असल्याचे शेट्टी म्हणाले. ते परभणीत बोलत होते. पिक विमा कंपन्यांनी राज्य आणि केंद्र सरकारची तिजोरी लुटली आहे. राज्य सरकारने आपल्या हिस्स्याचे पैसे न भरल्यामुळं पिक विमा मिळत नाही असे शेट्टी म्हणाले.**

## माऊली, तुकोबारायांच्या..

**(पान १ वरुन) लागला आहे. तर दुसरीकडे वारकरी संप्रदायातून देखील तीव्र रोष व्यक्त करण्यात येत आहे. परिणामी संत ज्ञानेश्वर,संत तुकारामांच्या यादीत डॉ. बालाजी तांबेंचं नाव आल्याने नवा वाद देखील रंगण्याची चिन्हं आहे.**

## काँग्रेसचे निम्मे नेते भाजपला मिळालेले : राहुल गांधी

**(पान १ वरुन)** ते तोडणे. काँग्रेसमध्ये नेत्यांची कमी नाही. बब्बर शेर सारखे येथे कार्यकर्ते आहेत. मात्र, या काँग्रेस कार्यकर्त्यांना मागून चेनने बांधले आहे. रेसच्या घोड्याला वरातीच्या घोड्यात बांधले आहे.', असे राहुल गांधी म्हणाले.

# शिक्रापुरातील युवकांमुळे अनाथाला माहेरचा आधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील तळेगाव रोड परिसरालगत अनेक दिवसांपासून एका बेकारीच्या आसऱ्याला थांबून राहणाऱ्या एका निराधार इसमाला माहेर संस्थेचा दाखल करण्यात युवकांना यश आले आल्याने युवकांमुळे अनाथाला माहेरचा आधार मिळाला आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील तळेगाव रोड लगत असलेल्या विशाल बेकरी जवळ अनेक दिवसांपासून एक इसम निराधार पद्धतीने राहत होता, दरम्यान सदर इसमाकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव दत्तात्रय हरिभाऊ रणखांबे असून त्याचे येथे कोणी नसल्याचे सांगितले, त्यांनतर सामाजिक कार्यकर्ते शेरखान शेख व राहुल रुके यांनी अनाथांसाठी कार्यरत असलेल्या माहेर संस्थेशी संपर्क साधून दत्तात्रय यांची वैद्यकीय तपासणी प्रक्रिया पूर्ण करत दत्तात्रय हरिभाऊ रणखांबे यांना माहेर संस्थेच्या सणसवाडी करुणालय प्रकल्पामध्ये दाखल करण्यात आले.

यावेळी माहेर संस्थेचे व्यवस्थापक विजय तवर, सामाजिक कार्यकर्ते शेरखान शेख, श्रीकांत भाडळे, राहुल रुके, गिरीधर कांबळे हे उपस्थित होते, तर यावेळी युवकांनी प्रयत्न करत निराधार व्यक्तीला आधार देण्याचे काम केल्याने दत्तात्रय रणखांबे यांनी देखील युवकांचे आभार मानले.



शिक्रापूर ता. शिरुर येथील निराधार व्यक्तीला माहेर संस्थेत दाखल करताना युवक.

## महाविहार मुक्ती आंदोलनाच्या पाठिंब्यासाठी पुण्यात विराट मोर्चा

सहभागी झाले होते. बालगंधर्व चौकात बुद्ध वंदना करून मोर्चाची सुरूवात झाली. तथागत भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीसह शांतता संदेश देत हा मुक महामोर्चा मार्गस्थ झाला. भंते च्या हस्ते डेक्कन येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अलका चौकात सभा घेवून मोर्चाचा समारोप करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती कार्यालय, पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय व जिल्हाधिकारी यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. पोलिस उपायुक्त संदीप सिंग गिल यांनी निवेदन स्वीकारले.

मोर्चाला संबोधीत करताना भंते राजरत्न म्हणाले, इ. स. पूर्व 563 पासून तथागत भगवान गौतम बुद्धांना ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली त्या ठिकाणी सम्राट अशोकाने त्यांच्या काळात ऐतिहासिक बौद्ध विहाराची निर्मिती केली आहे. मात्र आज त्या विस्तीर्ण बौद्ध विहाराच्या परिसरात अतिक्रमण करण्यात आले असून इतर देवी देवतांच्या नावाने तेथील विहार रूपांतरीत करण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी महाविहार आहे त्याच्या उजव्या बाजूस बौद्ध मूर्ती सापडून देखील तिथे इतर देवी देवतांची मंदिर उभारली जात आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांची जन्मभूमी म्हणून आज जागतिक स्थरावर भारताकडे आदराने पाहिले जात. अन् आज त्याच देशात महाबोधी महाविहार मुक्तीसाथी जगभरात आनंदोलन केली जात आहेत. लोकं रस्त्यावर उतरली आहेत. ही भारतसरकारसाठी निंदनीय बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यामध्ये तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी देखील भंते राजरत्न यांनी केली.

## पुण्यात गुन्हेगारी घटनांचे सत्र

मद्यधुंद अवस्थेमध्ये तरूणांनी अश्लील चाळे करत, सिग्नलवरती रस्त्याच्या मधोमध BMW गाडी उभी करून, बाहेर येत रस्त्यावर लघुशंका केल्याची घटना समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वी पुण्यातील सिंहगड परिसरात कामावरून घरी परतणाऱ्या एका दाम्पत्याचा किरकोळ कारणावरून काही तरुणांसोबत वाद झाला .या वादा नंतर त्या तरुणांनी दांपत्याला शिवीगाळ करत कोयत्याने हल्ला केला .या घटनेनंतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले .घाबरलेल्या दांपत्याने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात धाव घेत घटनेची माहिती दिली .त्यानंतर पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला आहे .पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत . कोथरूड परिसरात एमआयटी कॉलेज जवळ रिक्षाचालक आणि नागरिकांमध्ये तुफान हाणामारी झाली .गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढल्याचे चित्र आहे .कोथरूड मध्ये एका तरुणाला गुंड गजा मारण्याच्या गुंडांनी मारहाण केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली .दुसरीकडे कोथरूडमध्ये नागरिकांमध्ये भीतीच वातावरण आहे .दरम्यान एमआयटी कॉलेज जवळ रिक्षा चालक आणि नागरिकांमध्ये तुफान हाणामारी झाल्याचं सीसीटीव्ही वायरल होतोय .

## दिल्लीत महिन्याला अडीच...

दिल्लीत भाजपचे सरकार आले आहे. यामुळे आता ही योजना राबवण्यात आली आहे. महिला समृद्धी योजनेत दर महिन्याला महिलांना २५०० रुपये दिले जातात.
विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. यात गरीब महिलांना दर महिन्याला २५०० रुपये देऊ, अशी घोषणा करण्यात आली होती. भाजप सरकारने आता या योजनेची अंबलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. या योजनेअंतर्गत ८ मार्चपासून रजिस्ट्रेशन सुरु झाले आहे.

# वाजेवाडीत हॉटेलमधील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**शिक्रापूर :** वाजेवाडी ता. शिरुर येथील चाकण शिक्रापूर रस्त्यालगत एका हॉटेल मध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर शिक्रापूर पोलिसांच्या पथकाने छापा टाकत कारवाई करुन पंचवीस हजार रुपयांची रक्कम जप्त करत विठ्ठल भैरोबा माशाळे, संतोष काळुराम लोखंडे, राहुल हावगीराव तरगुडे, संतोष दिपक मोंदुळे, हनुमंत बजाबा राक्षे, शरद सहादु विघे, भरत नाथाराव बोंबडे यांच्यासह बासरी हॉटेल चालक धनंजय तुकाराम तोडकर यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले आहे.

वाजेवाडी येथील चाकण शिक्रापूर रस्त्यालगत हॉटेल बासरी मध्ये काही इसम पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याची माहिती शिक्रापूर पोलिसांना मिळाली त्यांनतर उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, हवालदार श्रीमंत होनमाने, रोहिदास पारखे, अमोल दांगडे, विकास पाटील, जयराज देवकर यांनी सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता पोलिसांना तेथे काही इसम पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याचे दिसून आले, दरम्यान पोलिसांनी त्यांच्या जवळील जुगाराचे साहित्य व रोख पंधावीस हजार रुपये जप्त करत सर्वांना ताब्यात घेतले विठ्ठल भैरोबा माशाळे वय २८, रा. दिघी पुणे मूळ रा. कसबेवाडी, ता. उमरगा, जि. धाराशीव, संतोष काळुराम लोखंडे वय ३५, रा. मरकळ ता. खेड, राहुल हावगीराव तरगुडे वय ३८ रा. भोसरी, मूळ रा. जिरगा ता. मुखेड जि. नांदेड, संतोष दिपक मोंदुळे वय ३६ वर्षे रा. तुळापुर हनुमंत बजाबा राक्षे वय ५७, रा. राक्षेवाडी ता. खेड, शरद सहादु विघे वय ५० रा. आंबेठाण चौक, ता. खेड, भरत नाथाराव बोंबडे वय ५१, रा. चऱ्होली फाटा आळंदी ता. खेड मूळ रा. भातांगळी ता. लातूर, बासरी हॉटेल चालक धनंजय तुकाराम तोडकर वय ४६ वर्षे रा. केंदूर ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत गायकवाड हे करत आहे.

### पोलिसांच्या कारवाईबाबत उलट-सुलट चर्चा

● शिक्रापूर पोलिसी यापूर्वी ज्या ज्या ठिकाणी हॉटेल मधील जुगार अड्ड्यांवर कारवाई केली तेथे जुगार खेळणाऱ्या सर्वांचे मोबाईल व वाहने जप्त केली आहेत, मात्र सदर बासरी हॉटेल मध्ये केलेल्या कारवाई मध्ये कोणत्याही व्यक्तीचा मोबाईल अथवा वाहन जप्त केले नसल्याने पोलिसांच्या या कारवाई बाबत उलट सुटल चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
9•3•2025

# स्नेहजनांच्या चांदरातीत उजळणाऱ्या विकासदिशांचे चिंतन !!

**पुण्याला खऱ्या अर्थाने ज्यांनी मोठं केलं आणि अजूनही 'प्रगतशील पुणे' उभे करण्याचे स्वप्न ज्यांच्या दृष्टीत आणि तशी हिंमत ज्यांच्या मनगटात आहे असे पुण्यातील निवडक - प्रतिष्ठित आणि टॉप ५० लोक 'फ्रायडे क्लब'च्या निमित्ताने जमले होते. त्या मैफिलीमध्ये जे दिसलं, ऐकलं ती एक दंतकथाच वाटावी असं आहे ....**

**मी अनुभवलेल्या 'फ्रायडे क्लब'च्या मैफिलीचा पूर्वार्ध ... !**

सध्या पुण्याची चौफेर बदनामी सुरू आहे. प्रत्येक दिशेला प्रत्येक माध्यमातून, चर्चेतून त्रासाची - आंदोलनाची, घडलेल्या घटनांवर प्रक्षुद्धतेने व्यक्त होण्याचीच भावना चहुकडे दिसते. पण या सगळ्यामध्ये 'कुठेतरी काहीतरी चांगलं होईल', काहीतरी भव्यदिव्य होईल हा आशावाद बाळगणारे आणि त्यावरच न थांबता ते घडविण्यासाठी आतुरणारे धडपडणारे काही हात 'फ्रायडे क्लब'च्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. पेटवणाऱ्या शंभर हातांपेक्षा विझविणारे दहा हात महान असतात. पण ते दहा हात एकत्र करण्याची कल्पकता काही लोकांमध्ये असते, 'अभ्यासंती प्रकटावे' या युक्तीने या क्लबमध्ये हे हात एकत्रित करण्याची युक्ती राज देशमुख यांनी साधली आहे.

अंधारलेल्या या वातावरणात विखुरलेले दीपस्तंभ एकत्र येतात आणि एका नव्या पुण्याची स्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कृती कार्यक्रमांवर चर्चा केली जाते. हे एक अद्भुत चित्र आहे... पुणेकरांच्या प्रत्येक मनाला उभारी देणारे हे चित्र पुण्यातील 'फ्रायडे क्लब' या 'विद्वानांच्या - उद्योजकांच्या - विचारवंतांच्या' मैफिलीत दिसून येते.

अशीच एक रम्य 'फ्रायडे क्लब'ची संध्याकाळ २८ फेब्रुवारीच्या रात्री अनुभवास मिळाली. तसे पाहिले तर सर्वच जाती-धर्माचे लोक येथे होते. परंतु कुणालाही कुठल्याही जातीचे लेबल चिकटलेले नव्हते. अनेक पक्षांचे भिन्नभिन्न विचारांचे फॉलोअर्स देखील होते. परंतू कोणाच्याही हातात त्या पक्षाचा - गटातटाचा अजेंडा नव्हता .

'चांगले काय करता येईल' या एका अजेंडाखाली या सर्वांची तोंडे बोलत होती, कान ऐकत होते, अन् मनगटे वळवळत होती. जे चांगले घडले आहे त्याचे सत्कार, सन्मान, गौरवोद्गार अतिशय मोकळ्या मनाने व्यक्त होत होतेच परंतु कोणीही कुठलाही अभिनवेश न ठेवता 'व्हॉट इज गुड फॉर फ्युचर' हा एकमेव थॉट घेऊन प्रत्येक जण येथे 'प्रचंड सक्रिय' झालेला दिसत होता.

'फ्रायडे क्लब' ही संकल्पना दोन वर्षापासून सुरू झाली. परंतु त्याला आता मूर्त स्वरूप येत आहे. या महिन्यातील 'फ्रायडे क्लब'चे आयोजक राज देशमुख, अली भाई देखाणी, सुकुमार सरदेशमुख आणि राजेश पांडे होते.

या अलीभाई नावाच्या अवलियाचीही एक वेगळीच गोष्ट आहे ती समजली. थोडेसे विषयांतर करून त्याबद्दल लिहितो... अली भाई हे एक्स आर्मी पर्सन आहेत. पॅरॅशूटमधून खाली येताना त्यांना दुखापत झाली. त्यांना मिलिटरी सोडावी लागली. परंतु, भारत सरकारने त्यांना खूप मोठी धनराशी दिली. या धनराशीचे करायचे काय ? म्हणून त्यांनी पुण्यामध्ये मोठी लँड बँक तयार केली आणि गरजू संस्थांना तसेच पुण्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या काही संस्थांना ते या जमिनी देऊ लागले. त्यातूनच विमाननगर परिसरात सिम्बॉयसिससारख्या संस्था उभ्या राहिल्या. आणखी अजून बऱ्याच संस्था, कार्य उभे राहिले. परंतु दातृत्वाच्या बाबतीत मन मोठे असणारे अलीभाईंचे तोंड मात्र या दातृत्व कथा सांगताना कंजूस होते, त्यामुळे फार काही समजले नाही.. तर असे हे आली भाई या कार्यक्रमाचे होस्ट होते.

राज देशमुख हे सदाबहार व्यक्तिमत्व. या सगळ्या फुलांना एका माळेत ओवणारे एक 'सोशल लीडर' म्हणून पुढे आले. एक प्रतीथयश कर सल्लागार असून, ते गेल्या काही वर्षांपासून 'माणुसकीची चळवळ' राबवतात आणि खऱ्या अर्थाने माणसातील हिरे शोधून काढतात. त्यांनी या सर्वांचा सत्कार समारंभ केला. सर्वांना एकत्रित आणले आणि सर्वांमध्ये एक आंतरिक स्नेह निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पुण्याला खऱ्या अर्थाने ज्यांनी मोठं केलं आणि अजूनही हे पुणं मोठं करण्यामध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा असणार आहे, अशा सगळ्या विधायक - सकारात्मक सतप्रवृत्त आणि प्रचंड उर्ध्वगामी ऊर्जा असणाऱ्या लोकांना एकत्रित करणे हा 'फ्रायडे क्लब'चा ध्यास आहे.

चितळे बंधूंचे इंद्रनील चितळे, कर्तबगार आणि कर्तव्य कठोर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भूमिकेत लपलेला एक सृहदयी लेखक, कवी असे IAS शेखर गायकवाड, पुणे पुस्तक महोत्सवसारखे अभिनव संकल्पना राबविणारे राजेश पांडे, IAS किशोर राजे निंबाळकर, IPS भगवानराव मोरे, मराठी चित्र नाट्य रसिकांचा ताईत प्रवीण तरडे, मुकाईवडीच्या निर्जीव डोंगरात नैसर्गिक अविष्कार शोधून एक संपन्न जीवनशैली देणारे सुशील देशमुख, पुणे विद्यापीठाचे प्र_ कुलगुरू डॉ. पराग काळकर, आता जशी AI इंट्रोड्यूस होत आहे, तशी जेव्हा IT इंट्रोड्यूस होत होती. तेव्हा त्याला खऱ्या अर्थाने दिशा देणाऱ्या काही तज्ञांपैकी एक असलेले श्री दीपक शिकारपूर, विशेष म्हणजे ते आता आयटी सोबत AI मध्येही तितकेच तरबेज झाले आहेत. आणि पुन्हा नवी दिशा देण्यासाठी तितक्याच उमेदीने सज्ज झाले आहेत, व्यंकटेश बिल्डकॉन श्री . अंकुश आसबे, सुहाना मसाल्याचे विशाल चोरडिया, 'सह्याद्री हॉस्पिटल'चे डॉ. शिशिर जोशी, यशस्वीचे विश्वेश कुलकर्णी, संवाद'चे सुनील महाजन, डॉ. सोमनाथ पाटील , 'निसर्ग हॉटेल'चे जवाहर चोरगे, विजय गवारे, 'गिरमे फार्म'चे किशोर गिरमे, 'अर्थ वर्षिप WE ' संस्थेचे पराग मते, जया निम्हण, अशोक चांदगुडे, भावार्थ देखणे, आमचे माध्यम सहकारी असलेले सकाळचे मुख्य संपादक निलेश खरे, 'लोकमत'चे विजय बाविस्कर, ज्येष्ठ पत्रकार आणि या 'फ्रायडे क्लब'चे संस्थापक सदस्य असलेले नंदकुमार सुतार हे निवडक परंतु 'कळीचे माध्यमकर्मी' देखील यावेळी उपस्थित होते.

कुठलीही अवास्तव गर्दी नाही. केवळ मोजक्या लोकांची ही दर्दी मैफल उत्तर रात्रीपर्यंत रंगली. या सुरील संध्याकाळी जुन्या गीतांच्या भाव विश्वात नेणारे स्वर्गीय स्वर होतेच, परंतु खरा सूर पुण्याच्या स्वप्नवत विकासासाठी होणाऱ्या कृती कार्यक्रमाचा होता..... !





विश्लेषण
अनिरुद्ध बडवे
(मुख्य संपादक)
राष्ट्रसंचार

**बहुत कुछ घटेगा-बिघडेगा,**
**लेकिन प्रेम की भावना**
**और प्रगती की ईर्षा**
**बनी रहने चाहिये।**
**अंधेरे मे दिये लगानेही चाहिये।**

**और ये हमारी जिम्मेदारी है**
**किसी समाज की आलोचना**
**मत करो।**
**खुद को जिम्मेदार मानो**
**और परिस्थिती बदलो,**
**हम ही समाज है। लगे रहो...**

**ताजा कलम :**

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोशारी हे देखील येथे अचानक प्रकटले. वेन्यू असलेल्या सँडविक बंगलोजवळच राजभवन आहे. तेथे ते आले असल्याचे राजेश पांडे यांना समजले. ( आता या पांडे महोदयांना कुठल्याही मैफिलीत कुठल्याही VIP अचानक आणण्याचे आणि मैफिलीतून एखाद्या VIP ला उठवून पाठविण्याचा वकूब आहेच ) पांडे यांनी त्यांना फोन करून या कार्यक्रमाची माहिती दिली आणि 'या गप्पा मारायला' असा निरोप धाडला .

कुठलाही अभिनवेश न बाळगता कोशारी तेथे उपस्थित झाले. त्यांनी अडीच तास संपूर्ण कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. जेवण केले. चार युक्तीच्या गोष्टी ऐकवल्या..




'बहुत कुछ घटेगा _ बिघडेगा , लेकिन प्रेम की भावना और प्रगती की ईर्षा बनी रहने चाहिये। अंधेरे मे दिये लगानेही चाहिये, और ये हमारी जिम्मेदारी है _ किसी समाज की आलोचना मत करो। खुद को जिम्मेदार मानो और परिस्थिती बदलो, हम हि समाज है। लगे रहो ..... असे म्हणत ते निघून गेले .

कोशारी यांच्या हे समारोपाचे शब्द सर्वांच्या इच्छांना, अपेक्षांना, जबाबदारीला संजीवनी देत' आत्मभान' जागवणारे होते .

anirudhabadave@gmail.com

# उपेक्षित महिलांचे जीवन



**भारतात ८ मार्च १९४३ साली प्रथम महिला दिन साजरा झाला. १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिलावर्ष' म्हणून साजरे केले तेंव्हा पासून स्त्रियांच्या समस्या मांडल्या जाऊ लागल्या, संघटना वाढीस लागल्या बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्न बदलत गेले तश्या मागण्याही बदलत गेल्या सरकारी कार्यालय, विविध संस्था व राजकीय पक्ष कार्यालयातून ८ मार्च साजरा होतो, परंतु अविरतपणे कष्टमय जीवन जगणाऱ्या महिलांना ना हक्काची जाणीव ना उद्या येणाऱ्या काळाचे समाजभान नसलेल्या, अशा असंघटित,असुरक्षित महिलांना मात्र आजही उपेक्षा सोसावी लागत आहे. सर्वत्र जागतिक महिलादिन उत्साहाने साजरा होत असताना औद्योगिक क्षेत्रात असंघटीत महिलांची उपेक्षा दिसून त्यांच्यासाठी दिन नसून 'दीन' झाला.**

औद्योगिक क्षेत्रातील व झोपडपट्टी भागात कमी मोबदल्याची लहानसहान कामं करणाऱ्या महिला काच, कागद, पत्रा गोळा करणाऱ्या, धुणी भांडी, घरकाम, सा\ साई काम, रस्त्यावर खेळणी विकणारी, भाजी विकणारी, भटारखान्यात काम करणारी, तर जंगलातून डिंक मध गोळा करणारी महिला दिवसाला कसे बसे पोटापुरते मिळवते. अशी रोजी रोटी कमवणारा एक वर्ग शहरीकरणा बाहेर, बाजार पेठेची गावे, उद्योग नगरी सारख्या ठिकाणी अश्या महिला आपली उपजीविका करत असतात सध्या अनेक कंपन्या, वर्कशॉप, दुकाने, पंप, आदी ठिकाणी कमी रोजगारात महिला मिळतात म्हणून त्यांना काम दिले जाते. त्यांच्याकडून पुरुषाप्रमाणे कामे करुन घेतली जातात. सध्या उधोग नगरीत २८० ते ३०० रुपये तुटपुंज्या वेतनावर महिलांकडून ८ ते १० तास काम करून घेतले जाते. शिवाय वेतन वेळेवर मिळण्याची हमी नाही. ठेकेदारी पद्धतीमुळे महिलांचे आता शारीरिक, मानसिक व श्रम शोषण होत असते, शिवाय आरोग्य विषयी कोणतीच सुविधा उपलब्ध नसते. परंतु या महिलांना सामावून घेणारी कोणतीच संघटना ग्रामीण भागात नाही. हक्कांची जाणीव करून देणाऱ्या समाजसेवी संस्था नाही. आधार देण्यासारखे त्यांनी कोणी नसते अश्या महिलांना जागतिक महिला दिन असतो याचे अज्ञान असते. म्हणून यामहिलांना जास्त प्रमाणात आरोग्य विषयक समस्या असतात.

सध्या बाजार पेठेची गावे, उद्योग नगरी अश्या ठिकाणी मजूर अड्डे निर्माण होत असून त्या नाक्यावर ठिकाणी सुद्धा महिला रोजगारासाठी उभ्या असतात. अनेक महिला बांधकाम कामगार, वीटकामगार, दगड फोडणारे, लाकूफाटा तोडणाऱ्या, शेत मजूर, उसतोड कामगार कंपनीत जडकाम करणाऱ्या महिला या अति श्रमाची कामे करत असतात. परंतु त्या ठिकाणी पुरुषांच्या मानाने कमी दरात महिला कामाला मिळतात. शिवाय त्यांची संघटना नसते याचा ायदा हा त्या ठेकेदाराला होत असतो. त्यामुळे या महिला वर्षानुवर्ष पीडित राहतात. एकीकडे झगमगाटाचा दुनियेत उच्चभ्रू महिला जागतिक महिला दिन साजरा करतात परंतू अशा महिलांची त्यांना कोणतीच आठवण होत नसते. त्या साठी पुढे येत नाहीत. या महिला अनेक वर्ष असेच राबत असतात भविष्यात मात्र आरोग्य धोक्यात येते आणि आजारपण जवळ येते खालावलेल्या जीवनमानामुळे विविध आजारांनी ग्रासलेल्या महिलांचे आयुष्य मात्र कमी होत जाते. वयाच्या चाळीशी नंतर एक वेळ अशी येते की कोणतेच कष्ट सहन होत नाही. भविष्य काळात कोणतीच तरतुद केलेली नसते त्यामुळे परावलंबी जीवन जगावे लागते. कोणत्या महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण अवश्य आहे हे शासनाने लक्षात घेतले पाहिजे.



सामाजिक
विठ्ठल वळसेपाटील
राष्ट्रसंचार

### 'यत्र नार्यस्तु पुजन्ते, रमन्ते तत्र देवता '


वेद पुराणात स्त्रीला असलेले महत्व ते आज पर्यंत अबला ते सबला असा होणारा महिला दिनानिमित्त प्रवास मांडला जातो. सबलीकरणा बाबत लिहिले, बोलले जाते, ऐकविले जाते. आजही महिला कशा असुरक्षित नाहीत, आत्याचाराला बळी पडताहेत. हे सारे मांडले जाते तर कोणी घेतलेली उतुंग भरारी कौतुकाची ठरते. उदयोजक बनलेल्या महिला, राजकारणी महिला यांचा महिला दिन वेगळा असतो आणि सतत रात्रंदिवस कष्ट सोसणाऱ्या असंघटित महिलांच्या पदरी मात्र निराशाच दिसते उदयोजक महिलेकडे कामाला असलेल्या महिलांना खरंच शासन नियमाप्रमाणे वेतन मिळते का ? एका स्त्रीने दुसरीवर केलेला हा असाच अन्याया नाही का ? जो पर्यंत मागास राहिलेला वर्ग, पिडीत असलेला घटक मुळ प्रवाहात आणला जात नाही तो पर्यंत अश्या सन्मानजनक दिनाची उदासीनता जाणवत राहणारच. ही डिजीटल इंडिया होणाऱ्या देशाची शोकांतिका आहे.



# सॅनिटरी नॅपकिनची 'जागृती'

यंदाचा महिला दिन हा आंतरराष्ट्रीय सुवर्ण महोत्सवी दिन म्हणून खास आहे या दिनाचे औचित्य साधून निरनिराळ्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेऊन आपली कारकीर्द यशस्वी करण्यासाठी अनेक महिलांना या महिलादिन निमित्ताने गौरवले जात आहे. आणि तुमच्या यशोगाथा वेगवेगळ्या माध्यमातून प्रकाशित केल्या जात आहे ही आनंदाची गोष्ट आहे. राष्ट्रपती पदी विराजमान झालेल्या माननीय द्रौपदी मुर्मू, भारताच्या अर्थमंत्रीपदी विराजमान झालेल्या माननीय निर्मला सीतारामन यासारख्या महिलांना एका उच्च शिखरावर पाहिल्यावर आम्हाला अभिमान वाटतो. सामाजिक बांधिलकीचा वसा घेऊन समाजसेवा करणाऱ्या काही संस्था व व्यक्ती सुद्धा गौरवास पात्र आहे. अशाच वसा जपणाऱ्या पुण्यातील जागृती संस्थेच्या संस्थापिका सौ स्वानंदी देशमुख रथ यांचेही आवळे वेगळे कार्य गेल्या पाच वर्षांपासून चालू आहे.

मासिक पाळी संदर्भात महिला प्रबोधन, सॅनिटरी नॅपकिन्स वापरण्याची आवश्यकता व वापरलेल्या नॅपकिन्सचा कचरा वेगळा टाकण्यासाठी 'रेड डॉट' ची मोहीम चालवणे इत्यादी महिलांच्या आरोग्याशी संबंधित कार्य जागृती फाउंडेशन करते. याशिवाय धाराशिव जिल्ह्यातील 'अळणी' या गावी मतिमंद निराधार अनाथ मुलींचे पालकत्व मायेने व सामाजिक बांधिलकीने जतन करणारी 'स्व- आधार' संस्था कौतुकास पात्र आहे. श्री चव्हाण व त्यांचा संपूर्ण स्टाफ हे इंद्रधनुष्य यशस्वीपणे पेलत आहेत. त्यांच्या या कार्यात 'जागृती फाउंडेशन' च्या संस्थापिका सौ स्वानंदी रथ व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा मोलाचा हातभार गेल्या पाच वर्षांपासून लागत आहे. संस्थेतर्फे दर महिन्याला या स्व आधार संस्थेतील किशोरवयीन मुलींसाठी पुरेसे सॅनिटरी नॅपकिन मोफत पुरवले जात आहेत. अशा दिव्यांग म्हणजे अपंग अनाथ अंध असलेल्या सुमारे १८ ते २० हजार मुलींसाठी जागृतीने मोफत सॅनिटरी नॅपकिन्स चे वाटप केले आहे. राष्ट्रीय स्तरावरही जागृतीचा गौरव झाला आहे दिव्यांग मुलींसाठी संवेदनशीलपणे कार्य करणारी जागृती फाउंडेशनची यापुढे देखील अशीच यशस्वी वाटचाल सुरू राहणार आहे.



प्रबोधन
स्वानंदी देशमुख -राठी
राष्ट्रसंचार



# जिथे घर, तिथे कृत्रिम पक्षी पाणवठा

**राज्यातील तापमानात चढ-उतार नोंदवण्यात येत असून, वातावरणात बदलही झालेले आहेत उन्हाचा कडाका वाढलेला आहे. या उन्हाळ्याचा त्रास, फटका सर्वसामान्यांप्रमाणे पशू-पक्ष्यांना आणि प्राण्यांपेक्षा पक्ष्यांना जास्त बसत आहे. यामध्ये मुख्यत्वे उंचावर उडणाऱ्या पक्ष्यांसह लहान पक्ष्यांनाही उष्माघाताचा फटका बसत असल्याचे आढळून आले आहे.**



प्राणिमित्र
-प्रा . योगेश हांडगे
राष्ट्रसंचार

वाढत्या उन्हामुळे अंगाची काहिली होत असल्याने फक्त माणसेच हवालदिल होत नसून याचा फटका पक्ष्यांनाही बसत आहे. कमी पर्जन्यमानामुळे, दुष्काळामुळे पाणवठे, तलाव, विहिरी तसेच एकूणच शहर व परिसरातील भूजलाची पाणीपातळी प्रचंड खालावली आहे. या पाण्याच्या दुर्भिक्षामुळे वन्यजीव व पक्ष्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे गरजेचे बनले आहे. यंदा मार्च महिन्यापासूनच उन्हाचा चटका बसू लागल्याने ठिकठिकाणी पक्षी जखमी अवस्थेत सापडत आहेत. शहरी भागातील पक्ष्यांचे जीवनमान धोक्यात आल्याची भीती व्यक्त होत असतांनाच आता यासाठी सामाजिक संस्था, पक्षी व प्राणिमित्रांनी पुढाकार घेत प्राणिमात्रांवर दया केली पाहिजे आणि याकरिता तरुणाईही सरसावलेले आहे असे ठिकठिकाणी दिसत आहे. शहरी भागात पक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. घरी कृत्रिम पाणवठे तयार केले असून गच्चीवर, बाल्कनीत तसेच बागांमध्ये मातीची उथळ भांडी पाण्याने भरली आहेत. तसेच खाण्याची सोयही केली आहे.

वाढत्या उष्म्याचा परिणाम माणसांबरोबरच वन्यजीव व पक्ष्यांवर होत आहे. उन्हाचा जास्त फटका पक्ष्यांना बसत असल्याने त्यांच्या शरीरातील पाणी कमी होण्यास सुरुवात होते. त्यामुळे उडताना अचानक खाली पडणे, तारांमध्ये अडकून गंभीर जखमी होणे अथवा पाण्याअभावी पक्षी तडफडून मरत आहे असे गंभीर प्रकार पक्ष्यांबाबत घडत आहेत. सध्या चिमण्या, बुलबुल, कोकीळ, पारवे, कावळे, यांसारखे पक्षी उष्माघाताचे बळी पडत असल्याचे बहुतेक ठिकाणी आढळून येत आहे. त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. उष्माघाताचे बळी ठरलेल्या/जखमी झालेल्या पक्ष्यांवर पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कम्प्युटर टेक्नॉलॉजी येथील कम्प्युटर विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रा. योगेश हांडगे, तसेच एका नामांकित माहिती तंत्रज्ञान कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून सेवेत असलेले त्यांचे मित्र प्रीतम गायकवाड आणि त्यांचा मित्र समूह हे उपचार करीत आहेत. सामाजिक संस्था व पक्षीमित्रांनी वन्यजीव व पक्ष्यांचा जीव वाचविण्यासाठी प्रामुख्याने पुढे येऊन पिण्याच्या पाण्याबरोबरच खाद्याचीही सोय करणे गरजेचे आहे.

### उन्हाळ्यात नागरिकांनी इमारतींमधील पक्ष्यांची घरटी तोडू नये !

- शहरातील बहुतेक नागरिक हे साफसफाई करतांना त्यांच्या घरात अथवा इमारतीत होणारी पक्ष्यांची घरटी काढून टाकतात, त्यामुळे आधीच झाडावर घरटे करू न शकल्याने हे पक्षी बाहेर येतात व निवाऱ्याचा पर्याय न मिळाल्याने उन्हाला बळी पडतात. त्यामुळे उन्हाळ्यात नागरिकांनी इमारतींमधील पक्ष्यांची घरटी तोडू नये व शक्य झाल्यास कृत्रिम घरटी घराच्या परिसरात बसवावे

- घरावर व बागांमध्ये मातीची उथळ भांडी पाण्याने भरलेली ठेवावीत. तसेच शक्यतो हि पाण्याची भांडी सावलीत ठेवावीत
- शक्य झाल्यास कृत्रिम घरटी घराच्या परिसरात बसवा.
- घरा-इमारतींमधील पक्ष्यांची घरटी तोडू नका
- घराच्या परिसरात गच्चीवर, बाल्कनीत खाण्याची सोयही करावी
- पिण्याचे भांड खोलगट नव्हे तर पसरट असावं.
- पाणी वेळोवेळी बदलत राहावं व भांडंही स्वच्छ ठेवावे कारण सतत भांडयात पाणी राहिल्याने शेवाळाचीही निर्मिती होते आणि पाणी पिण्यास अयोग्य होते.

# शेती संस्कृतीतून कृषी पर्यटन

**गाव आणि गावपण' हरवत चाललंय असे आपण म्हणतो. गाव तसेच शहरी लोकांच्या मनात ही सल आहे. आजही खेड्याची ओढ असलेले शहरी भागातले काही लोक आपल्या ग्रामीण संस्कृतीशी नाते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि अशा लोकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्याचं काम या आगळ्या वेगळ्या कृषी पर्यटनातून होत आहे.**

पर्यटन दिशा



-गणेश चप्पलवार
राष्ट्रसंचार

गावातील लोक, आदिवासी, वाड्या-पाड्यातील लोकांची लोकांचे वेशभूषा, केशभूषा, पारंपरिक पेहराव, राहणीमान, बोलीभाषा, चित्रकला इ. चे जतन आणि संवर्धन करण्याची काम कृषी पर्यटनाच्या माध्यमातून करू शकतो. अनेक पारंपरिक खेळ, लोककला, आदिवासी संस्कृती ही खरी आपली सांस्कृतीक ओळख होत आहेत. ग्रामीण लोककलांमध्ये भारुड, गोंधळ, जागरण, कीर्तन, वासुदेव, गारुड्याचा खेळ, डोंबाऱ्यांचा खेळ, लेझीम खेळणे इत्यादींचे प्रात्यक्षिक खेळ पर्यटकांना दाखवून आपले अस्सल गावपण जपू शकतो.

अनेक पारंपरिक खेळ आहेत. त्यात विट्टी दांडू, गोट्या, चकारी, गोफण, गलोल इ. तसेच ग्रामीण भागातील साहित्य शिकं, (शिंकाळं) उखळ, वरवंटा, खलबत्ता, पाटा, चूलीसह शेतातील अवजारे कालबाह्य होत. या सर्व पारंपरिक वस्तूंची जागा आता नवतंत्रज्ञान घेत आहेत. या वस्तूंचे जतन व संवर्धन करण्याचे काम राज्यातील कृषी पर्यटन करत आहेत.

शेतमाल विकण्यासाठी, हस्तकला, गायनकला, वाद्यकला, महिला बचत गटाचे साहित्य विक्री या गावाची परंपरा व संस्कृतीसाठीचे उत्तम व्यासपीठ व ठिकाण म्हणजे कृषी पर्यटन होय. या सर्व गोष्टी पर्यटकांना पाहता येतात तसेच प्रत्यक्ष हाताळून अनुभवताही येतात. कृषी पर्यटन केंद्रातून ग्रामीण संस्कृतीचे संरक्षण / संवर्धन चांगल्या पद्धतीने अनेक कृषी पर्यटन रज्यातील अनेक कृषी पर्यटन करत आहे. याची देही, याची डोळा अनुभवण्याची संधी कृषी पर्यटनामुळे निर्माण होत आहे.

पर्यटकांना शेतीचा आणि गावाचा आनंद देणे, शेती व्यवसायाला चालना देणे, कृषी पर्यटनातून गावाचा विकास करणे, शेती उत्पादनांना हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करून देणे, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध देणे, कृषी पूरक इतर व्यवसायांना प्रोत्साहन देणे, पर्यावरण पूरक व अनुकूल पर्यटनाचा अनुभव देणे, शेतकऱ्यांसाठी पर्यायी उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे, ग्रामीण संस्कृती, लोककला आणि परंपरेचे दर्शन घडवणे, पर्यटकांना शेती कामाचे अनुभव देणे, पर्यटकांना प्रदूषण विरहित पर्यटन घडवणे, निसर्गाच्या सानिध्याचा अनुभव देणे, कृषी व ग्रामीण संस्कृतीला चालना देणे, गावातील पडीक व गायरान जमीन वापरात आणण्याचे काम करू शकतो. राज्यातील शेतकऱ्यांनासह इतर कृषी संस्थाही कृषी पर्यटन केंद्र सुरू करू शकतात. कृषी पर्यटन हा ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम आहे.



# अभिजात मराठी भाषा : संस्कृतीचा वैभवशाली वारसा

**मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून, ती आपल्या संस्कृतीचा जिवंत वारसा आहे. तिच्या समृद्ध साहित्यिक परंपरेमुळेच तिला अभिजात भाषा म्हणून विशेष मान्यता प्राप्त आहे. ही भाषा शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची साक्षीदार असून, संत-साहित्य, लोककथा, अभंग, ओवी, भारुड यांसारख्या विविध साहित्य प्रकारांनी तिचे सौंदर्य अधिकच खुलवले आहे.**

आजच्या डिजिटल युगातही मराठी भाषेचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट तिच्या संवर्धनासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. तरीही, बदलत्या काळानुसार तिच्या अभिजाततेचे जतन करणे ही काळाची गरज आहे.

**अभिजात भाषेची ओळख आणि मराठीची पात्रता :**

भारत सरकारने २०१३ साली मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव ठेवला होता. अभिजात भाषा म्हणून एखाद्या भाषेची ओळख होण्यासाठी खालील निकष पूर्ण करावे लागतात:

१) मूळ अस्तित्व – भाषेचा इतिहास दोन हजारांहून अधिक वर्षे जुना असावा.

२) समृद्ध साहित्य परंपरा – शतकानुशतके अप्रतिम साहित्य उपलब्ध असावे.

३) मूळ भाषिक परंपरा – आधुनिक भाषांवर तिचा प्रभाव असावा, परंतु ती कोणत्याही आधुनिक भाषेतून विकसित झालेली नसावी.

४) भाषिक संपन्नता आणि वैविध्य – तिच्या व्याकरणात आणि शब्दसंपत्तीमध्ये मौलिक वैशिष्ट्ये असावीत.

मराठी भाषा हे सर्व निकष पूर्ण करते. तिचे साहित्य १००० वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास स्वामी यांचे ग्रंथ आजही वाचले जातात. संस्कृतच्या प्रभावाखाली असूनही, मराठीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

### मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास

- **१. प्रारंभीचे स्वरूप आणि विकास**
- मराठी भाषा ही प्राकृत आणि अपभ्रंशातून विकसित झालेली आहे. ११व्या-१२व्या शतकात लिहिल्या गेलेल्या शिलालेखांमध्ये आणि ताम्रपटांमध्ये मराठी भाषेचे ठसे आढळतात.
- **२. संतसाहित्याचा सुवर्णकाळ (१३व्या-१७व्या शतकात)**
- संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) ने मराठीला वेगळी ओळख दिली. संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांनी ओव्यांच्या आणि अभंगांच्या माध्यमातून लोकशिक्षण केले.
- रामदास स्वामींचे दासबोध हे मराठीतील एक अमूल्य साहित्यसंपदाच आहे.
- **३. शिवकालीन मराठी भाषा आणि राज्यकारभार**
- छत्रपती शिवाजी महाराजांनी राजव्यवहारकोश तयार करून मराठीत प्रशासकीय संज्ञा निर्माण केल्या. त्यामुळे राजकारण आणि प्रशासनासाठी मराठीचा वापर वाढला.
- **४. पेशवाई आणि आधुनिक मराठीचा विकास (१८व्या-१९व्या शतकात)**
- पेशव्यांच्या काळात मराठीत बखरींची रचना झाली. सुधारकांनी मराठी वृत्तपत्रांची सुरुवात केली.
- लोकहितवादी, ज्योतिबा फुले, आगरकर यांसारख्या विचारवंतांनी मराठीला आधुनिक विचारधारा दिली.
- **५. २० व्या शतकातील वैविध्यपूर्ण मराठी साहित्य**
- कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, ग. दि. माडगूळकर यांनी विविध साहित्यप्रकार समृद्ध केले. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्याने मराठीला नवे आयाम दिले.

### मराठीची वैशिष्ट्ये – अभिजाततेची ओळख

- मराठी भाषा तिच्या वैशिष्ट्यपूर्ण व्याकरणामुळे आणि शब्दसंपत्तीमुळे वेगळी ठरते. तिची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:
- **१. समृद्ध शब्दसंपत्ती आणि व्याकरण**
- मराठीत संस्कृत, प्राकृत, फारसी, उर्दू आणि इंग्रजी शब्द आढळतात. तिच्या व्याकरणात संधी, समास, विभक्तीप्रत्यय यांसारखी लक्षणे दिसून येतात.
- **२. विविध साहित्य प्रकारांची परंपरा**
- संतसाहित्य, भारुड, अभंग, ओवी, लावणी, तमाशा, कीर्तन, पोवाडा यांसारख्या लोकसंगीत आणि साहित्यशैलींनी मराठी समृद्ध झाली आहे. आधुनिक मराठीत कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, विज्ञानकथा यांसारख्या अनेक साहित्यप्रकारांचा समावेश होतो.
- **३. बोलीभाषांचे वैविध्य**
- कोकणी, मालवणी, अहिराणी, वऱ्हाडी, झाडीबोली, विदर्भी अशा अनेक बोली मराठी भाषेच्या समृद्धतेचे प्रतीक आहेत. या बोलींमधून स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा वारसा जपला जातो.



वारसा
-किरण काळे, ग्रंथपाल पुणे
राष्ट्रसंचार

### सध्याची परिस्थिती आणि आव्हाने

- मराठी भाषा आजही कोट्यवधी लोकांद्वारे बोलली जाते, पण तिच्यासमोर काही गंभीर आव्हाने आहेत:
- **१. इंग्रजीचा वाढता प्रभाव**
- शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इंग्रजीचे वर्चस्व वाढत आहे. तरुण पिढी इंग्रजीकडे अधिक झुकत असल्याने मराठीचा वापर कमी होत आहे.
- **२. शुद्धलेखन आणि भाषाशैलीतील बदल**
- सोशल मीडियामुळे भाषेची व्याकरणशुद्धता आणि शुद्धलेखन कमी होत आहे. इंग्रजी शब्दांचा सर्रास वापर मराठीच्या स्वाभाविक सौंदर्यात अडथळा आणतो.
- **३. मराठी भाषेचे संरक्षण आणि संवर्धन**
- सरकारने मराठी भाषा सक्तीने वापरण्याचे काही निर्णय घेतले असले तरी, त्याची अंमलबजावणी अपुरी आहे. पालकांनी आपल्या मुलांना मराठीत संवाद साधण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

### भविष्यातील संधी आणि मराठीचे संवर्धन

- **१. डिजिटल युगातील मराठी भाषा**
- मराठीत ई-बुक्स, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स वाढत आहेत. मराठी संगणक प्रणाली (OCR, स्पीच टू टेक्स्ट) यांसारख्या तंत्रज्ञानामुळे भाषा अधिक दृढ होत आहे.
- **२. शिक्षणात मराठीचा अधिक वापर**
- शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करावा. स्पर्धा परीक्षांसाठी आणि उच्च शिक्षणासाठी मराठीत अधिक सामग्री उपलब्ध व्हावी.
- **३. मराठी साहित्य आणि चित्रपट क्षेत्राचा विकास**
- दर्जेदार साहित्य आणि चित्रपट निर्माण केल्यास मराठीची लोकप्रियता वाढेल. महाराष्ट्र सरकारने साहित्य पुरस्कार आणि अनुदान यांसारखे उपक्रम अधिक प्रभावी करावेत.
- "मराठी भाषा जपूया, अभिमानाने मराठीत बोलूया!"

# दगडांच्या चित्रांद्वारे गांधीजींचे जीवनकार्य

**मूळच्या भोपाळ येथील अनिता दुबे सध्या पुण्यातील खराडी येथे वास्तव्यास आहेत. लहानपणापासून खडे आणि विविधरंगी व आकाराचे दगड वेचण्याच्या आवडीतून त्यांनी दगडांपासून चित्र काढण्याची कला विकसित केली. या चित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन महाराष्ट्र गांधी स्मारक निधी ट्रस्टतर्फे आयोजित गांधी विचार साहित्य संमेलनात करण्यात आले आहे. हे प्रदर्शन कोथरूड येथील गांधी भवन येथे रविवारपर्यंत सर्वांसाठी खुले आहे. त्यानिमित्ताने लेखाचा धांडोळा ..**

रंग-रेषांनी चित्रे रेखाटताना आपण नेहमीच पाहतो. मात्र आजूबाजूला आढळणाऱ्या विविधरंगी दगडांमधून चित्रांचे वेगळे जग निर्माण करण्याचा कलाविष्कार लेखिका आणि प्रस्तर कलाकार अनिता दुबे यांनी केला आहे. दुबे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जीवन दगडांच्या चित्रांमधून उभे केले आहे. गांधीजींच्या केवळ जीवनदर्शनाचा अनुभव न देता त्यांच्या जीवनकार्याचा अनुभव या चित्रांमधून येतो.

दगडांपासून तयार केलेल्या चित्रांविषयी



कलाकारी
अनिता दुबे
राष्ट्रसंचार

आणि या कलेविषयी सांगताना दुबे म्हणाल्या, माझे बालपण भोपाळमध्ये गेले. उन्हाळी सुट्टीत मी आईसोबत आजोळी जायचे. तेव्हा रोज नर्मदा नदीच्या किनारी आम्ही फिरण्यासाठी जात असू. तेव्हा नर्मदेच्या पात्रातील विविधरंगी आणि वेगवेगळ्या आकाराचे गोटे उचलण्याची आणि त्याचा संग्रह करण्याची सवय मला लागली. घरांमध्ये खूप गोट्यांचा संग्रह झाल्याने त्याच्याआधारे वेगवेगळ्या डिझाइन मी करू लागले. त्यातूनच चित्र साकारण्याची कल्पना सुचली. लग्न झाल्यानंतर आजोळी जाणे कमी झाले. त्यामुळे नर्मदा नदीशी नातेही कमी झाले. माझे पती वायुदलात होते. त्यामुळे बदली झाली की नवीन राज्यात आणि शहरात तसेच दुर्गम भागात जावे लागायचे. या प्रवासात मी ठिकठिकाणचे खडे, दगडे गोळा केले. पुण्यात राहत असताना लष्करातील एका अधिकाऱ्याने दोन पोती खडे मला दिले.



काही वर्षांपूर्वी देशात दंगल सुरू असताना पती म्हणाले की स्वातंत्र्यानंतर सत्तर वर्षांनीही आपल्या देशात जातीय आणि धार्मिक हिंसाचार सुरू आहे. तेव्हा झालेल्या चर्चेतून मी बापूंचे साहित्य वाचायला घेतले. त्यांच्या विचारांचा, कार्याचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला. त्यातून ही चित्रे काढण्याची कल्पना मला सुचली.

**बापूंच्या जीवनकार्यावर पन्नास चित्रे** मी काढली आहेत. या चित्रांमधील खडे विविधारंगी आहेत. ते तोडून फोडून सजवण्यात आलेले नाहीत. त्यांचा मूळ रंग कायम ठेवण्यात आला आहे. दगड आणि काड्यांचा वापर करून ही चित्रे रेखाटली आहेत. महात्मा गांधी यांना आफ्रिकेत आलेले वर्णद्वेषाचा अनुभव, त्यांचे भारतातील आगमन, स्वातंत्र्य चळवळ, कपड्यांचा त्याग, अहिंसा, सहिष्णुता, सत्याग्रह अशा घटना आणि मूल्यांचे दर्शन या चित्रांमधून घडते. हे प्रदर्शन भोपाळ, दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र आणि पुण्यात हे पहिल्यांदाच आयोजित करण्यात आले आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवनावर तसेच पुस्तकांचे मुखपृष्ठ म्हणून मी अनेक चित्रे काढली आहेत. या कलेसाठी मला विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

### प्रस्तरकलेविषयी...

दगडांना संस्कृतमध्ये प्रस्तर म्हणतात. दगड कापणे, छाटणे आणि आकार तयार करण्यासाठी कोरीव काम करण्याला शिल्पकला म्हणतात. तर दगडांना त्यांच्या मूळ स्वरूपापासून (कणानुसार) मोठ्या आकारात बदलून कोणतीही कापणी आणि छाटणी न करता कलाकृती तयार करण्याचे काम म्हणजे दगडी कला.

- सुमारे तीन-चार वर्षांपूर्वी, दांडी यात्रा दगडापासून बनवली गेली होती. त्यानंतरच मी गांधीजींचा जीवनप्रवास दगडात लिहिण्याचा संकल्प केला. मी गेल्या तीन वर्षांपासून गांधीजींवर काम करत आहे. देशाच्या या अमृत महोत्सवात देशभरातून गोळा केलेल्या दगडी कलेद्वारे गांधीजींवर केलेले काम, खडी, धागे, दगड, कागद, बांबूच्या काठ्यांद्वारे, त्या सर्व शहीद देशवासियांना अभिवादन आहे ज्यांच्या प्रयत्नांमुळे आणि बलिदानामुळे आज आपण स्वतंत्र आणि प्रगतीशील भारताचे नागरिक आहोत.



# नवतंत्रज्ञान आणि महिला

**नवतंत्रज्ञान आणि महिला या दोन घटकांचा आजच्या समाजात अत्यंत महत्त्वपूर्ण संबंध आहे. नवतंत्रज्ञानाच्या वापरामुळे महिलांना विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करण्याचे, नव्या आव्हानांना सामोरे जाण्याचे आणि आपल्या जीवनातील समस्या सोडवण्याचे अद्वितीय मार्ग मिळाले आहेत. आज महिलांसाठी इंटरनेट, स्मार्टफोन, आणि डिजिटल उपकरणे यांचा वापर अत्यंत सोपा आणि उपयुक्त झाला आहे. विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर शिक्षण घेणे, ऑनलाइन व्यापार सुरू करणे, आणि सामाजिक नेटवर्किंग करणे यामुळे महिलांना आपला व्यवसाय किंवा करियर वाढवण्याची संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणे, महिलांना घराबाहेर काम करण्यासाठी सुरक्षित पर्यावरण मिळवण्यासाठी देखील तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण ठरला आहे.**

आजघडीला आपला भारत देश एका संक्रमणावस्थेतून जातो आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच ह्या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण ह्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि दैदिप्यमान यश मिळवण्यासाठी जी बाब खर्या अर्थाने आवश्यक आहे ती आपल्याकडे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे - पैसा नव्हे तर विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे उर्फ स्किल्ड मॅनपॉवर. आता इथं वूमन (महिला) अतिशय महत्वाच्या आहेत.

एकविसाव्या शतकाची सुरूवात होउन आता २५ वर्ष झाली आहे झाली आहे तरीही, गेल्या पंधरावीस वर्षांत ज्या प्रकारे बदल झाले तितके त्याआधीच्या ५० वर्षांतही झाले नव्हते असे म्हणता येईल. संगणकीय क्रांतीचे परिणाम, स्मार्टफोनच्या रूपाने, मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर झालेले परिणाम आपण पाहतो आणि अनुभवतोच आहोत

आपली देशात अनेक स्टार्ट अप्स महिलांनी सुरु केले आहेत व त्यात लक्षणीय प्रमाण प्रथम पिढीच्या युवा मुलींचे आहे महिला या त्या तंत्रज्ञानाच्या फक्त ग्राहक नाहीत तर सध्याच्या आणि भविष्यातल्या डिजिटल विश्वाच्या त्या शिल्पकारही आहेत. म्हणूनच महिलांच्या सहभागाबद्दलचे हे सगळे महत्त्वाचे घटक आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये महिलांनी आतापर्यंत नेहमीच महत्त्वाचं योगदान दिलं आहे.

**शिक्षण आणि विकास:**

• इंटरनेट आणि डिजिटल साधनांमुळे महिलांना शिक्षणाच्या नवीन संधी मिळाल्या आहेत. दूरस्थ शिक्षणामुळे (Distance Learning) आणि ऑनलाइन अभ्यासक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलाही उच्च शिक्षण घेऊ शकतात.





तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com
संगणक तज्ज्ञ

• डिजिटल साक्षरता वाढल्यामुळे महिलांना माहिती मिळवणे, कौशल्ये विकसित करणे आणि स्वतःचा विकास करणे सोपे झाले आहे.

**आर्थिक स्वातंत्र्य :**

• ऑनलाइन व्यवसाय आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून महिला स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते आणि त्या कुटुंबाला हातभार लावू शकतात.

• डिजिटल बँकिंग आणि ऑनलाइन पेमेंटमुळे आर्थिक व्यवहार करणे सोपे झाले आहे, ज्यामुळे महिलांना आर्थिक निर्णय घेणे अधिक सोपे झाले आहे.

**सामाजिक सक्षमीकरण :**

• सोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्ममुळे महिलांना त्यांचे विचार मांडण्याची आणि सामाजिक मुद्द्यांवर आवाज उठवण्याची संधी मिळाली आहे.

• महिलांसाठी सुरक्षित ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स तयार करून सायबर गुन्ह्यांना आळा घालणे गरजेचे आहे.

• डिजिटल मध्यस्थ हि एक संकल्पना आहे कि जिला स्मार्टफोन इंटरनेट ह्या आयुधांचा वापर करणे जमले आहे. सुशिक्षित पदवीधरांबरोबरच घरकामात गढलेल्या गृहिणीलाही हे शक्य आहे. गेल्या पिढीपर्यंत गृहिणीला दुसरे काही करणे शक्यच नसायचे कारण घरातली कामेच आवरताना तिचा दिवस (आणि उत्साह) संपत असे. परंतु सध्या नवतंत्रज्ञान हाताशी असल्याने, विभक्त कुटुंबांमुळे आणि बऱ्याचश्या सुशिक्षित घरांनी स्वीकारलेल्या सामाजिक बदलांमुळे स्त्रीच्या मागचा घरकामाचा एकंदर रगाडा कमी झाला आहे आणि नवा विचार स्वीकारून अमलात आणणे तिला शक्य झाले आहे असे म्हणता येईल.




# टी-शर्ट फॅशनचे ट्रेंडी वारे



**उन्हाळा सुरू झाला की कपड्यांच्या फॅशनमध्येही मोठे बदल होतात. उन्हाळ्यात हलके, आरामदायी आणि स्टायलिश कपडे घालण्यावर भर दिला जातो. अशा वेळी टी-शर्ट हा तरुण-तरुणींसाठी सर्वोत्तम पर्याय ठरतो. विविध प्रकारचे टी-शर्ट वेगवेगळ्या प्रकारे स्टाईल करता येतात. वेगवेगळ्या प्रसंगांसाठी कोणते टी-शर्ट कशाबरोबर घालावेत, याचा विचार केला तर फॅशनसोबतच कंफर्टही जपला जाऊ शकतो.**

टी-शर्ट हा उन्हाळ्यासाठी केवळ कंफर्टेबल नाही, तर स्टायलिश लूकसाठीही एक उत्तम पर्याय आहे. वेगवेगळ्या प्रसंगांसाठी योग्य प्रकारचा टी-शर्ट निवडून तो योग्य कपड्यांसोबत घालण्याने लूक अधिक आकर्षक होतो. उन्हाळ्याच्या दिवसांत हलक्या, breathable फॅब्रिकमधील ट्रेंडी टी-शर्ट परिधान करणे फॅशन आणि आराम यांचा उत्तम मिलाफ ठरू शकतो.



फॅशन
ज्योती हांडगे, पुणे
राष्ट्रसंचार

1. ग्राफिक टी-शर्ट्स हे टी-शर्ट वेगवेगळ्या प्रिंट्स, कोट्स, डिझाईन्स किंवा कार्टून कॅरेक्टर्ससह येतात. ते कॅज्युअल आणि फंकी लुकसाठी उत्तम पर्याय आहेत.

- केव्हा घालावे?

कॉलेज, ट्रिप किंवा फ्रेंड्ससोबत आउटिंगसाठी

डे-आउट किंवा मॉलमध्ये फिरताना

- कशाबरोबर घालावे?

रिप्ड जीन्स, शॉर्ट्स किंवा स्कर्ट

स्नीकर्स किंवा कॅज्युअल शूज

क्रॉसबॉडी बॅग किंवा बॅकपॅक

2. ओव्हरसाइज्ड टी-शर्ट्स (Oversized T-Shirts)

हलक्या आणि मोठ्या आकाराचे टी-शर्ट हा सध्या ट्रेंडी प्रकार आहे. हे टी-शर्ट स्ट्रीट फॅशनमध्ये खूप लोकप्रिय आहेत.

केव्हा घालावे?

कॉलेज किंवा डे-ट्रिपला जाताना

आरामदायी घरगुती लूकसाठी

- कशाबरोबर घालावे?

सायकल शॉर्ट्स, टॉर्न जीन्स किंवा लेगिंग्ज

मोठे हूप इअररिंग्ज आणि स्नीकर्स

टोपी किंवा कूल शेड्स

3. क्रॉप टी-शर्ट्स (Crop T-Shirts)

उन्हाळ्यात ट्रेंडी आणि कूल लूकसाठी क्रॉप टी-शर्ट्स उत्तम पर्याय आहे. हे फिटनेस आणि स्ट्रीट स्टाइलमध्ये खूप लोकप्रिय आहेत.

- केव्हा घालावे?

जिम, योगा किंवा वर्कआउटसाठी

कॉलेज फेस्ट किंवा पार्टीसाठी

कशाबरोबर घालावे?

हाय-वेस्ट जीन्स, शॉर्ट्स किंवा ट्रॅक पॅन्ट

कॅप आणि व्हाइट स्नीकर्स

मिनिमलिस्ट ज्वेलरी

टी-शर्ट कुठे खरेदी करावे?

ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स वर अनेक हाय-एंड ब्रँड्सआणि इतर ब्रँड्स आहेत तसेच लोकल मार्केट्समध्ये हे उपलब्ध आहेत.





सलमान खानच्या बहुप्रतिक्षित 'सिकंदर' ची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट ईदच्या दिवशी थिएटरमध्ये दाखल होईल. भाईजानचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काय कमाल करेल हे येणारा काळच सांगेल, पण काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या त्याच्या टीझरने चांगलीच खळबळ उडवून दिली होती. या टीझरला यूट्यूबवर तीन कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले.


# 'सिकंदर' ची प्रतीक्षा

'सिकंदर' च्या निर्मात्यांनी आता सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना स्टारर चित्रपटातील 'जोहरा जबीन' हे पहिले गाणे रिलीज केले असून त्याची एक झलक समोर आली आहे. सध्या ईदच्या उत्साहात भाईजानचे हे गाणे यूट्यूबवर धुमाकूळ घालत आहे. 'दबंग' खान आणि रश्मिकाची पडद्यावरची केमिस्ट्री प्रेक्षकांना किती आवडेल याचा अंदाज त्यांच्या पहिल्या गाण्यावरूनच येत आहे. 'जोहरा जबीन' मध्ये सलमान खानची एन्ट्री पूर्ण स्वॅगसह दाखवण्यात आली आहे. या गाण्यातील त्याच्या डान्स स्टेप्स मागील गाण्यांपेक्षा खूपच वेगळ्या आहेत. नेहमीच आपल्या लूकमध्ये असणारा भाईजान या गाण्यात गुडघे टेकून रश्मिकावर प्रेम व्यक्त करताना दिसतो. गाण्यातील हे दृश्य चाहत्यांना खूप आवडत आहे. 'जोहरा जबीन' हे गाणे नकाश अझीझ आणि देव नेगी यांनी गायले आहे. गाण्याला संगीत प्रीतम दा यांनी दिले आहे. याशिवाय, आजच्या प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन त्यात रॅप देखील जोडण्यात आला आहे. तेव्हा या दोघांची केमिस्ट्री बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्याची अपेक्षा आहे.



# रान्यावर तस्करीचा आरोप

कन्नड चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री रान्या राव ला पोलिसांनी अटक केली आहे. अलिकडे पोलिस तिच्या वाढत्या आंतरराष्ट्रीय सहलींवर लक्ष ठेवून होते. अखेर सोन्याची तस्करी केल्याच्या आरोपाखाली तिला बेंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती डीपीजीची मुलगी म्हणून स्वत:ची ओळख करून द्यायची आणि स्थानिक पोलिस कर्मचाऱ्यांना घरी सोडण्यासाठी फोन करायची.



दुबईहून एमिरेट्सच्या विमानाने बेंगळुरूला उतरल्यानंतर पोलिसांनी तिला अटक केली. डीआरआय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार तिच्या अंगावर बरेच सोने होते. खेरीज तिने कपड्यांमध्ये सोने लपवले होते.१५ दिवसांमध्ये चार वेळा दुबईला गेल्यानंतर अधिकाऱ्यांना अभिनेत्रीवर संशय येऊ लागला होता. सोन्याच्या तस्करीत तिला पोलिस किंवा इतरांकडून काही मदत मिळत होती का, याचा तपास आता सुरू आहे. यासंबंधी अभिनेत्रीला १४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली. विमानतळावर तिच्याकडून एकूण १४.८ किलो सोने जप्त करण्यात आले. या सोन्याची बाजारभाव किंमत सुमारे १२ कोटी रुपये आहे. या बातमीबद्दल चित्रपटसृष्टीत अनेक प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. रान्याने प्रसिद्ध अभिनेता सुदीपसोबत 'माणिक्य' (२०१४) मध्ये काम केले आहे. आता पोलिस अधिकारी यासंबंधांची गांभीर्याने चौकशी करतील. त्यामुळेच तिच्या नेटवर्कमधून कोणताही गुन्हेगार सुटू शकणार नाही, असे वाटते.



# 'विकेंड' आता ओटीटीवर

मनोरंजनविश्वात 'ऑस्कर'ची चर्चा असतानाच सोहळ्यात अनेक छोट्या बजेटच्या चित्रपटांनी दाखवलेली ताकदही प्रेक्षकांनी अनुभवली. आता या शोमध्ये पुरस्कार मिळवलेल्या अनेक कलाकार आणि चित्रपटांबद्दल लोकांमध्ये रस वाढला आहे. त्यातील असाच एक चित्रपटाच्या ओटीटी रिलीजची माहिती अवश्य जाणून घ्या. आता हा चित्रपट तुम्ही ऑनलाइन पाहू शकता.

हॉलिवूड दिग्दर्शक जॉन एम चू यांचा 'विकेड' हा चित्रपट गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित झाला होता. तो खूप लोकप्रियही झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही उत्तम कलेक्शन केले. आता ओटीटी रिलीजबाबत बातम्या अशी की, तो २१ मार्च २०२५ रोजी जिओहॉटस्टारवर स्ट्रीम केला जाणारा आहे. चित्रपटात प्रसिद्ध गायिका एरियाना ग्रांडे देखील मुख्य भूमिकेत दिसत आहे.

'विकेड' च्या कमाईबद्दल बोलायचे झाले तर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याने ७०० दशलक्ष डॉलर्सचा आकडा ओलांडला होता. या चित्रपटाने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ४६०.६ दशलक्ष कमावले. अलीकडेच या चित्रपटाबद्दल बातमी आली की तो ७ मार्च रोजी जपानमध्ये प्रदर्शित झाला.

लोकप्रिय अमेरिकन पॉप गायिका आणि अभिनेत्री एरियाना ग्रांडे तिच्या प्रतिभेने जगभरात स्वतःची वेगळी ओळख राखून आहे. ती अनेकदा वैविध्यपूर्ण पोशाखांनी लोकांना आश्चर्यचकित करते. ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात ही गायिका गुलाबी रंगाच्या गाऊनमध्ये दिसली होती. हा ड्रेस शियापरेली स्प्रिंग-समर २०२५ कलेक्शनमधील होता. एरियानाचा हा पोशाख इतका अद्भूत होता की पाहिल्यानंतर सर्वांच्याच नजरा तिच्यावर खिळून राहिल्या. यावेळी मोकळ्या केसांऐवजी एरियानाने अंबाड्यासदृश केशरचना केली होती. तिचा हा लूक सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला.

# ऑस्करवर 'अनोरा'ची छाप

या वर्षीच्या ९७ व्या अकादमी पुरस्कार सोहळ्यावर 'अनोरा'च्या पाच ऑस्कर विजयाची अमीट छाप प्रेक्षकांनी बघितली. 'अनोरा' हा ऑस्कर २०२५ चा सर्वोत्तम चित्रपट रसिकांचे लक्ष वेधून गेला. त्यालाच यंदाचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी एकूण १० चित्रपटांना नामांकन मिळाले होती. ज्यात 'द ब्रुटालिस्ट', 'अनोरा', 'ड्यून पार्ट २', 'आय एम स्टिल हिअर', 'निकेल बॉय', 'द सबस्टन्स', 'विक्ड' आणि 'एमिलियन पेरेझ' यांचा समावेश होता. मात्र या सगळ्यांना मागे सारुन 'अनोरा'ने बाजी मारली, असेच म्हणावे लागेल.

२०२५ च्या ऑस्करमध्ये मिकी मॅडिसनला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. तिला 'अनोरा' तील दमदार अभिनयासाठी सन्मानित करण्यात आले. याच चित्रपटासाठी शॉन बेकर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. गाजलेल्या या अकादमी पुरस्कारांच्या सोहळ्यात यंदा ॲड्रियन ब्रॉडीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा किताब मिळाला. त्यांना हा पुरस्कार 'द ब्रुटालिस्ट' साठी मिळाला. ओपेनहायमर स्टार सिलियन मर्फी यांनी हा पुरस्कार प्रदान केला.



यंदा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटाचा ऑस्कर पुरस्कार 'आय एम स्टिल हिअर' या ब्राझिलियन चित्रपटाला मिळाला तर लोल क्रॉलीने सर्वोत्कृष्ट छायांकन पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट छायांकनाचा पुरस्का'द ब्रुटालिस्ट'ला मिळाला. तसेच या सोहळ्यात बड स्मिथपासून रॉजर प्रॅट आणि चार्ल्स शियरपर्यंत दिवंगत हॉलिवूड स्टार्सना भावनिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

यंदाचा लाईव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म पुरस्कार व्हिक्टोरिया वॉर्मीर्डन आणि ट्रेंट यांच्या 'आय एम नॉट अ रोबोट' या चित्रपटाने जिंकला. 'ड्यून पार्ट २' साठी पॉल लॅम्बर्ट, स्टीफन जेम्स, रेस साल्कोम्बे आणि गर्ड नेफझगर यांना सर्वोत्कृष्ट व्हिज्युअल इफेक्ट्सचा पुरस्कार मिळाला. तसेच सर्वोत्कृष्ट ध्वनीचा पुरस्कारही 'ड्यून पार्ट २' ला मिळाला. मायली सायरसकडून हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी गर्थ जेन, रिचर्ड किंग, रॉन बार्टलेट आणि डग हेम्फिल स्टेजवर आले होते.



# बॉक्स ऑफिसवर 'ड्रॅगन'चीही डरकाळी

सध्या बॉक्स ऑफिसवर एकामागून एक मोठ्या बजेटचे चित्रपट प्रदर्शित होत आहेत. या चित्रपटांच्या प्रचंड कलेक्शनमुळे निर्मात्यांना प्रचंड पैसा मिळत आहे. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत अनेक रेकॉर्ड मोडले. त्याच क्रमाने, विक्कीचा 'छावा' देखील बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करत आहे. या चित्रपटाने १७ दिवसांमध्ये जगभरात ६३७ कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे आणि अजूनही त्यात वाढ होत आहे.

पण या चित्रपटाच्या बोलबाल्यातही एका दक्षिण भारतीय चित्रपटाने कलेक्शनच्या बाबतीत शांतपणे १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे, हे नजरेआड करुन चालणार नाही. चर्चेतील या 'ड्रॅगन' नामक चित्रपटात प्रदीप रंगनाथन यांनी मुख्य भूमिका साकारली होती. अश्वथ मारिमुथु दिग्दर्शित हा चित्रपट २१ फेब्रुवारी २०२५ रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला आणि आता तो १०० कोटींच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. हा चित्रपट तमिळ तसेच तेलुगू भाषेत प्रदर्शित झाला आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रेम मिळाले. चित्रपटाची कथा एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याभोवती फिरते. ११.२ कोटींनी सुरुवात केलेल्या या चित्रपटाने सकस कथेमुळे आता अनेक मोठ्या बजेटच्या चित्रपटांना मागे टाकले आहे. 'ड्रॅगन' बॉक्स ऑफिसवर मंद गतीने कमाई करत असताना अर्जुन कपूरचा 'मेरे हसबंड की बीवी' चांगला कमाई करत होता. पण अर्जुनचा चित्रपट विकी कौशलच्या चित्रपटासमोर जास्त काळ टिकू शकला नाही. असे असताना प्रदीपच्या चित्रपटाबद्दल मात्र प्रेक्षकांची क्रेझ कायम राहिली.

'ड्रॅगन' ५५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. जगभरातील कलेक्शनवर नजर टाकली तर, या चित्रपटाने तामिळनाडूमध्ये ५१.२५ कोटी रुपये, तेलुगू राज्यांमध्ये १३.६५ कोटी रुपये, कर्नाटकमध्ये ७.३० कोटी रुपये आणि परदेशात २१.८० कोटी रुपये कमावले आहेत. यावरुनच त्याचे व्यावसायिक यश किती मोठे आहे, याचा अंदाज बांधता येईल.

'ड्रॅगन' हा 'एजीएस' च्या बॅनरखाली झळकलेला २६ वा चित्रपट आहे. याआधी एजीएस एंटरटेनमेंटने प्रदीपचा 'लव्ह टुडे' हा चित्रपट तयार केला होता.

# वाद आणि '...हल्ला'

बंडखोर कवी आणि दलित पँथर चळवळीचे संस्थापक नामदेव ढसाळ यांच्या वाटचालीचा वेध घेणारा, त्यांचे काम समोर आणणारा 'चल हल्ला बोल' या चित्रपटाची सध्या चर्चा आहे. हा चित्रपट प्रामुख्याने दलित पँथर, युवा क्रांती दल आणि त्यांच्या चळवळीवर आधारित आहे. तथापि, चित्रपटातील नामदेव



ढसाळ यांच्या कवितांवर सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला आणि चर्चेला तोंड फुटले. खेरीज त्यातील एका कवितेत अश्लीलता आहे असे सांगत 'ढसाळ कोण आहे? मला काहीच माहीत नाही' असे विधान केल्याने मोठा वाद निर्माण झाला. त्यानंतर लगेचच चित्रपटाच्या संपूर्ण टीमने या विधानावर आक्षेप नोंदवत संताप व्यक्त केला. या मुद्द्यावर महाराष्ट्रातील लोकही नाराजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, प्रसिद्ध दिग्दर्शक आणि अभिनेते हेमंत ढोमे यांनीही या घटनेवर दुःख व्यक्त केले. 'नामदेव ढसाळ यांचे विचार अनेक प्रश्नांवर विचार करायला भाग पाडतात. ते व्यवस्थेला प्रश्न विचारतात. नामदेव ढसाळ हा समता आणि मानवता पसरवणारा पँथर आहे. महाराष्ट्र, देश आणि संपूर्ण जगाला त्यांचा अभिमान आहे. जनमानसाचे नेते, महान जागतिक कवी म्हणजे 'नामदेव ढसाळ'... असे ते आपल्या प्रतिक्रियेत म्हणाले. दरम्यान, नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आणि ज्येष्ठ कवयित्री मल्लिका अमीर शेख यांनीही या विधानावर दुःख व्यक्त केले. अशा मुजोर अधिकाऱ्यांना सरकारने निलंबित केले असले तरी प्रश्न इथेच संपत नाही, असे त्या म्हणाल्या.

# 'अनुपमा'वर प्रेक्षक नाराज

रूपाली गांगुली गेल्या पाच वर्षांपासून 'अनुपमा' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे. मालिकेची कथा तिच्या व्यक्तिरेखेभोवती फिरते. पण अनेक वेळा या मालिकेला प्रेक्षकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. आताही एक नवीन व्हिडिओ समोर आला असून त्यात प्रेम आणि माहीचा एक सीन चित्रित करण्यात आला आहे. तो प्रेक्षकांना अजिबात आवडत नाहीये. व्हिडिओ प्रसिद्ध झाल्यानंतर, नेटकऱ्यांनी या दृश्यावर संताप व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरील लोकांनी या शोवर टीका केली आहे आणि क्लिपला अश्लील म्हटले आहे. एकूणच या मालिकेबाबत लोकांकडून अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत. एका वापरकर्त्याने 'अरे देवा... कृपया, 'अनुपमा'च्या लेखकाने, पटकथेत असा सीन जोडण्यापूर्वी विचार करावा' असे म्हटले आहे तर दुसऱ्या वापरकर्त्याने 'हे पूर्णपणे निर्लज्जपणाचे आहे!' असे म्हणत निषेध नोंदवला आहे. याशिवाय, मालिकेत अनुपमाच्या मुलीने घातलेला वधूचा पोशाखही अनेकांना आवडत नाहीये. खरं तर, हा लेहेंगा काही वर्षांपूर्वी अनुपमाची भूमिका साकारणाऱ्या रूपाली गांगुलीनेही वधू म्हणून परिधान केला होता. अशा परिस्थितीत, काही सोशल मीडिया वापरकर्ते म्हणतात की, प्रत्येक उत्कृष्ट कृतीची एक स्वस्त आवृत्ती असते. राहीचा वधूचा गेटअप प्रेक्षकांना अजिबात आवडत नाहीये.





# 'शोले' होतोय ५० वर्षांचा

हिंदी चित्रपटसृष्टीतील क्लासिक चित्रपटांबद्दल बोलताना 'शोले'चे नाव निश्चितच अग्रक्रमाने येते. या वर्षी दिग्दर्शक रमेश सिप्पी यांचा 'शोले' प्रदर्शित झाल्यास ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे सध्या याची चर्चा आहे. आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमी (आयफा) च्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र यांच्या प्रसिद्ध चित्रपट 'शोले' चे विशेष प्रदर्शन आयोजित केले गेले. चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयफा आयोजकांनी जयपूरच्या प्रसिद्ध राज मंदिर चित्रपटगृहात चित्रपटाचे विशेष प्रदर्शन आयोजित केले. स्क्रिनिंग दरम्यान चित्रपटाशी संबंधित अभिनेते, सह-कलाकार आणि गायक त्यांचे अनुभव ऐकायला मिळाले. या स्क्रिनिंगला बॉलिवूडमधील मोठ्या सेलिब्रिटींची उपस्थिती बघायला मिळाली. कार्यक्रमाची खास गोष्ट म्हणजे 'शोले' आणि राजमंदिर सिनेमा हे दोघेही या वर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करत आहेत.

'शोले' १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झाला तर राजमंदिर सिनेमाची पायाभरणी १९६६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व. मोहनलाल सुखाडिया यांनी केली. पुढे १ जून १९७६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री स्व. हरिदेव जोशी यांनी त्याचे उद्घाटन केले. या निमित्त आयफाने जयपूरमध्ये 'सिल्व्हर इन द न्यू गोल्ड' या थीमअंतर्गत आपला २५ वा वर्धापन दिन साजरा करत आहे.



## विद्यार्थ्यांची टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला भेट

**पिंपरी :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शरदचंद्र पवार कला वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव, आळंदी. वाणिज्य विभाग व बी.बी.ए.सी. ए. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने फिल्ड व्हिजिट अंतर्गत आळंदी-मरकळ रोड, चरोली खुर्द येथील ' टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड ' कंपनीला भेट दिली. या प्रसंगी प्रास्ताविक करतांना गणेश आगरे, आय.टी. हेड, टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी ' टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मध्ये कामाचे स्वरूप कसे असते. या कंपनीद्वारे नवीन सहभागी विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने ट्रेनिंग दिले जाते तसेच या ट्रेनिंगचा नोकरीची संधी प्राप्त करण्यासाठी कसा फायदा होतो या संदर्भात विविध जुन्या विद्यार्थ्यांचे उदाहरणे देऊन विवेचन केले. विनीत उगले, डायरेक्टर टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी अकाउंट सॉफ्टवेअरचा इतिहास, स्वरूप व उद्देश स्पष्ट करून त्याची निर्मिती कशी केली जाते तसेच त्याचा वापर कशा पद्धतीने होतो यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ' टॅक्स ब्लॉक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी स्वतःचे सॉफ्टवेअर कशा पद्धतीने तयार करते त्यासाठी कोणते घटक महत्वपूर्ण असून त्याचा ट्रेनिंगला आलेल्या विद्यार्थ्यांना कसा फायदा होतो या संदर्भात पी.पी.टी. च्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले.

## पे अँड पार्क योजनेत निर्धारित दर निम्म्याने कमी करा : भापकर

**पिंपरी** : पे अँड पार्क योजना राबवताना निर्धारित



केलेले दर निम्म्याने कमी करून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून महापालिकेला 50% निधी घेण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरात विविध भागात सन 2021 मध्ये पे अँड पार्क योजना राबवण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी महानगरपालिकेला यातून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाचा 50% पेक्षा अधिक हिस्सा घेण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेमुळे शहरातील करदात्या नागरिकांच्या खिशाला मोठ्या प्रमाणात भुर्दंड पडत होता. त्यामुळे या योजनेला मोठ्या प्रमाणात नागरिकांचा विरोध झाला होता. म्हणून ही योजना प्रशासनाला गुंडाळावी लागली होती. आपल्या मनपा प्रशासनाने पुन्हा एकदा पे अँड पार्कचे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील नाशिक फाटा मदर टेरेसा उड्डाणपूल, एम्पायर इस्टेट उड्डाणपूल, निगडी उड्डाणपूल आदि उड्डाणपुलाच्या खाली ही योजना प्रायोजित तत्त्वावर राबविण्यात येणार आहे.




## 'डी मार्ट'कडून फेक मेसेज

**पिंपरी :** महिला दिनानिमित्त 'डी मार्ट' कडून विशेष गिफ्ट व्हॉऊचर मिळणार असल्याचा फेक मेसेज सध्या व्हायरल होत आहे. त्याबाबत व्हॉटसअ‍ॅपवर आलेली फेक लिंक ओपन करून नये, डीमार्ट संदर्भात येणा-या बनावट लिंक वर क्लिक करू नये व त्यामध्ये आपली वैयक्तिक व खात्याची माहीती देवू नका. आपली गोपनिय माहिती खाते क्रमांक, एटीएम कार्ड नंबर, पासवर्ड, सीव्हीव्ही नंबर, इंटरनेट बँकिंग आयडी पासवर्ड अशी कोणतीही संवेदनशील माहिती कोणालाही शेअर करून नये. फसवणुकीसंदर्भात संशय आल्यास सायबर हेल्पलाईन १९३० किंवा cybercrime.gov.in वर संपर्क साधा, असे आवाहन पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी केले आहे.

## महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर कारवाई करा : सुप्रिया चांदगुडे

**भोसरी:** बलात्काराची घटना वारंवार घडू नये तसेच शालेय विद्यार्थिनी मुली व महिलांची छेडछाड करणाऱ्यांवर कारवाई करावी यासाठी पोलीस प्रशासनाने योग्य ती पावले उचलावी याकरिता आधार महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहराच्या उपाध्यक्ष सुप्रिया चांदगुडे यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केले आहे की शाहूनगर येथील शालेय विद्यार्थीनी व मुली यांची होणारी छेडछाड तसेच त्यांचा होणारा पाठलाग व त्यांना होणारे इतर अनेक त्रास तसेच तरुण व शालेय मुलांचे अति वेगाने वाहन चालविणे विनाकारण कर्कश आवाज करत बाईकचे हॉर्न वाजविणे तसेच बाईक रेसिंग यामुळे अनेक महिला व विद्यार्थी व मुली यांना याचा त्रास होत आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे या सर्व प्रकाराला आळा बसविण्यासाठी पोलीस प्रशासन वतीने योग्य ती पावले उचलणे आवश्यक असल्याने याबाबत योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

## जोडे मारो आंदोलन...




भोसरी मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी करीत शिवसेना युवासेना, भोसरी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी घटनेचा निषेध व्यक्त करीत क्रूर आणि खुनी वाल्मीक कराड याच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन केले.

## शिवसेना युवासेनेचा आंदोलनातून जोरदार निषेध व्यक्त

**भोसरी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची हत्या अतिशय निंदनीय आहे. त्यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी करीत शिवसेना युवासेना, भोसरी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी घटनेचा निषेध व्यक्त करीत क्रूर आणि खुनी वाल्मीक कराड याच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन केले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना मुख्य नेते एकनाथ भाई शिंदे, शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवा सेना प्रमुख श्रीकांत शिंदे, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आले होते.

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख शिरुर लोकसभा तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद, निलेश मुटके, युवासेना उपजिल्हाप्रमुख अरुण जोगदंड, युवासेना विधानसभा भोसरी प्रमुख आशिष जगदाने, युवसेना उपशहर प्रमुख दत्ता आवराळे, रोहित जगताप, भिवाजी वाटेकर, पठारे मामा आणि शिवसैनिक व युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मीक कराड व सर्व आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा दिली जावी, असे मत यावेळी शिवसैनिकांनी व्यक्त केले.

# बचत गटांच्या महिलांद्वारे सेवाकर बिलांचे वितरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील रहिवाशांचे सेवाकरांच्या बिलांचे वितरण आणि झोपडपट्टी वासियांचे सर्वेक्षण महिला बचत गटांच्या मार्फत करण्यात येणार आहे. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत 'सारथी सोनचीरैया' शहर उपजिविका केंद्राच्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधींच्या मार्फत हे काम केले जाणार आहे. या उपक्रमात सर्वेक्षणासाठी येणाऱ्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधींना झोपडपट्ट्यांमधील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

समाज विकास विभागाकडील दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत पवना शहर स्तरीय संघ स्थापन करण्यात आलेला आहे. या अंतर्गत महिला बचत गटांची जोडणी करण्यात आली असून त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी हा सिद्धी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

महिला सक्षमी करणासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत असून आता झोपडपट्टी वासियांच्या सर्वेक्षणाचे कामही महिला बचत गटांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहे.

- १) पिंपरी चिंचवड शहरात वर्ष २००२ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण ७१ झोपडपट्ट्या आहेत.
- २) ५५ झोपडपट्ट्यांना सेवाकराची बिले झोपडीधारकांना देण्यात येतात.
- ३) सेवाशुल्क बिले भरण्याबाबत नागरिकांची उदासिनता दिसून येते.
- ४) आता बचत गटांच्या महिला या ऑनलाईन अ‍ॅप द्वारे झोपडपट्टी वासियांचे सर्वेक्षण करून त्यांना सेवाशुल्कांची बिले वितरीत करून नागरिकांची जनजागृती करणार आहेत.





सर्वेक्षणाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे २३ हजार ७७८ बिलांचे वितरण महिला बचत गटांच्या मार्फत करण्यात येणार आहे. तसेच ज्या झोपडीधारकांची नोंद नाही परंतु झोपडी अस्तित्वात आहे, व त्यांना सेवाशुल्क बिल येत नसेल, अशा झोपडीधारकांची मोबाईल अ‍ॅप द्वारे नोंदणी या महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी महिला बचत गटांच्या महिलांना सहकार्य करावे,

— **शेखर सिंह** आयुक्त

# प्राधिकरणात 'रानजाई महोत्सव प्रदर्शन'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण यांच्या वतीने रानजाई महोत्सव' व २८ वे भव्य 'फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन नियोजित महापौर निवास निगडी प्राधिकरण येथील मोकळ्या मैदानात करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता मनोज सेठीया, बाबासाहेब गलबले, उप आयुक्त अण्णा बोदडे, माजी नगरसेवक अमित गावडे आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या गटांमधील विजेत्यांना महापालिकेच्या उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाच्या वतीने फिरते चषक तसेच रोख रक्कम स्वरूपात बक्षिसे देण्यात येणार आहेत. आज ९ मार्च रोजी कार्यक्रमस्थळी बक्षिस वितरण समारंभ संपन्न होणार आहे.





महोत्सवाच्या माध्यमातून टेरेस गार्डन, घरगुती रोपसंवर्धन आणि लँडस्केप डिझाइन यांसारख्या स्पर्धा घेतल्या जातात, स्पर्धेमध्ये विविध शोभिवंत फुले, फळझाडे आणि रोपांची आकर्षक मांडणी केली जाते. या हरित सोहळ्यास नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमाला पाठबळ द्यावे.

— **जयकुमार खोराटे**
अतिरिक्त आयुक्त

## जागतिक महिलादिन निमित्त नेत्र तपासणी शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** चिंचवड मधील महिलांसाठी भजनी मंडळ महासंघाच्या माध्यमातून विठ्ठल महादेव मंदिर व ईशा नेत्रालय यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित केले होते. यामध्ये तपासणीला सुमारे २५० भगिनी व काही बंधुंची सुद्धा तपासणी करण्यात आली. तसेच ज्यांना पुढील काही तपासण्याची आवश्यकता होती त्यांना नेत्रालयात नेण्याची व्यवस्था ईशा नेत्रालयाने केली होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दिपप्रज्वलन व भारत माता पुजनाने आणि डोळे तपासणी मशिन पुजनाने झाले. दिप प्रज्वलन मा. नगरसेवक सुरेश भोईर, गणेश मिरजकर, संतोष निंबाळकर, मा. नगरसेविका अश्विनी चिंचवडे, जेष्ठ नागरिक धोंडोपंत सायकर काका व ईशा नेत्रालयाचे यशवंत बोऱ्हाडे व डॉक्टर बंधु-भगिनींनी केले व कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अजित जगताप गुरूजींनी केले.





# आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

## 'ब' दर्जाच्या गृहनिर्माण सोसायट्यांना लाभ देण्यास शासनाची मंजुरी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महाराष्ट्र शासनाने आमदार स्थानिक विकास निधीचा उपयोग करण्यास 'ब' दर्जा असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना मंजुरी दिली आहे. आमदार शंकर जगताप यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्था पायाभूत सुविधांसाठी निधीचा लाभ घेऊ शकतील. महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने ४ मार्च २०२५ रोजी यासंदर्भात शासन शुद्धीपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील तसेच या क्षेत्राला ग्रामीण भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जागेवर पायाभूत सुविधांची कामे आता आमदार निधीतून करता येणार आहेत. त्यासाठी एका आमदाराला वर्षभरात सोसायट्यांच्या एकूण २.५० कोटी रुपयांपर्यंतच्या कामांसाठी शिफारस करता येणार आहे. त्यासाठी शासनाने घालून दिलेल्या अटी-शर्तींचे संबंधित सोसायट्यांना पालन करावे लागणार आहे.या निर्णयासंबंधी अधिक माहिती व संपूर्ण शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे

### सहकारी गृहनिर्माण संस्था करु शकतील पुढील कामे

- -रेन वॉटर हार्वेस्टींग – पाणीपुरवठा आणि जलसंधारणास चालना.
- - घनकचरा व्यवस्थापन – कचऱ्यावर प्रक्रिया आणि सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प.
- - सौर ऊर्जा प्रकल्प – सौर उष्णजल संयंत्र, सौर दिवे आणि नेट मिटरिंग.
- - ईव्ही चार्जिंग स्टेशन्स – स्वच्छ ऊर्जा प्रोत्साहन.
- - रस्ते व पदपथ सुधारणा
- – प्लास्टिकचा पुनर्वापर करून रस्ते व पेव्हर ब्लॉक्स बसवणे.
- - व्यायाम व हरित क्षेत्र – जॉगिंग ट्रॅक, ग्रीन जिम, मुलांसाठी खेळाचे साहित्य, वरिष्ठ नागरिकांसाठी कट्टे.

### आमदार निधीमुळे सोसायट्यांमधील विकासाला गती

- या निर्णयामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांना पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ते, पाणीपुरवठा, जलनिःसारण आणि इतर मूलभूत सुविधा सुधारण्यास मदत होईल. आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नांचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे.



## कडेपठार संस्थेच्या वतीने मुलींच्या नावे शैक्षणिक ठेव

**जेजुरी :** जागतिक महिला दिनानिमित्त जेजुरी येथील कडेपठार ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या वतीने ज्या मुलींना वडील नाहीत अशा सहा गरीब,होतकरू मुलींच्या नावाने पुढील शिक्षणासाठी शैक्षणिक ठेव ठेवण्यात आली असल्याचे पतसंस्थेचे अध्यक्ष व पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडे यांनी सांगितले.

कडेपठार पतसंस्था सातत्याने सामाजिक, शैक्षणिक,पर्यावरण रक्षण आदी क्षेत्रात कार्य करीत आहे. अनेक शाळांत पिण्यासाठी पाणी,झाडांसाठी ठिबक सिंचन,वृक्षारोपण,शेतकऱ्यांसाठी शिबिरे,शैक्षणिक साहित्य वाटप आदी उपक्रम राबविले जातात. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गरीब,होतकरू सहा मुलींच्या नावे पुढील शिक्षणासाठी शैक्षणिक ठेव संस्थेच्या वतीने ठेवण्यात आली. तसेच पतसंस्थेतील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## माजी सैनिक प्रतिष्ठानच्या वतीने वीर पत्नींचा सन्मान



**सासवड :** पुरंदर तालुका माजी सैनिक प्रतिष्ठानच्या वतीने वीर पत्नींचा सन्मान महिला दिनानिमित्त करण्यात आला गुलाब पुष्प देऊन घरोघरी जाऊन प्रतिष्ठानच्या वतीने वीर पत्नींचा सन्मान महिला दिनानिमित्त करण्यात आला श्रीमती शकुंतला रामराम बर्गे फडतरे ताई त्याच बरोबर प्रजापिता ब्रम्हकुमारी या ठिकाणी जाऊन हा सन्मान केला.

या वेळी माजी सैनिक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष चंद्रकांत कुंभार धनंजय जगताप सतीश खेनट किरण पुरंदरे.आदी मान्य उपस्थित होते. प्रतिष्ठान सातत्याने विविध उपक्रम राबवित असतात यंदा प्रथमच आम्ही वीर पत्नी यांना घरोघरी जाऊन प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान महिला दिनानिमित्ताने केला असल्याचे धनंजय जगताप यांनी सांगितले

**पोलिसांकडून तातडीने मदत मिळवण्यासाठी**

## १९२ क्रमांकाचा वापर मोठ्या प्रमाणावर करावा




**कारेगाव :** पोलिसांकडून तातडीने मदत मिळवण्यासाठी नागरिकांनी ११२ क्रमांकाचा वापर मोठ्या प्रमाणावर करावा असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी केले.

शिरूर पोलीस स्टेशन येथे पोलीस वार्षिक निरीक्षण पाहणी कार्यक्रमादरम्यान तालुक्यातील पोलीस पाटील,महिला दक्षता समिती,ज्येष्ठ नागरिक व पत्रकार यांच्याशी पोलिस अधीक्षक देशमुख यांनी संवाद साधला.यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना जिल्हा पोलिस अधीक्षक देशमुख म्हणाले की,शिरूर पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र मोठे असून, तालुक्यातील नागरिकांच्या मागणी वरून शिरूर शहर व शिरूर ग्रामीण असे दोन स्वतंत्र पोलीस स्टेशन निर्माण करण्यात येणार आहेत.तसा प्रस्ताव लवकरच शासनाला पाठवण्यात येईल,असेही पोलीस अधीक्षक देशमुख यांनी सांगितले.

यावेळी देशमुख यांनी शिरूर शहरामधील निर्भया पथकाचे कौतुक केले.तसेच शहरातील निर्भया पथकाची कामगिरी चांगली आहे असेही आवर्जून सांगितले.

## पारगांव जागतिक महिलादिन पशुधन मार्गदर्शनाने साजरा



**पारगांव :** पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी दोन पारगाव यांच्या वतीने आज दिनांक ०८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिलांना पशुपालन दूध व्यवसाय उत्पादन वाढीसाठी करावयाचे नियोजन शासनाच्या विविध योजना पशु पक्षामधील आरोग्य समस्या साथरोग निवारण लसीकरण जंत निर्मूलन आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले सदर कार्यक्रमांमध्ये पशु व्यवसाय मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार पशुवैद्यकीय दवाखाना पारगाव यांच्यावतीने करण्यात आला.

# त्या नराधमांना फाशी द्या - ॲड.पल्लवी रेगे

## महिला दिनानिमित्त संतुलन शेतकरी कष्टकरी महिला परिषदेचा महिला अत्याचार निषेध मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**वाघोली :** महिलांच्या न्याय हक्कासाठी महिला दिनाचे औचित्य साधत संतुलन शेतकरी कष्टकरी महिला परिषदेचे अध्यक्ष अँड.पल्लवी रेगे व दगडखाण कामगार विकास परिषद महाराष्ट्राचे अध्यक्ष अँड.बी.एम. रेगे यांच्या नेतृत्वाखाली विधानभवन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महिला अत्याचार निषेध भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी उपस्थित राहून मोर्चाचे नेतृत्व केले.वाघोलीच्या माजी सरपंच जयश्री राजेंद्र सातव पाटील यांनी मोर्चाला पाठिंबा दर्शविला.पुण्यामध्ये दिवसे दिवस महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटना वाढत असल्याने त्यांची सुरक्षा हा गंभीर विषय बनला आहे. अशा अमानुष अमानवी प्रवृत्तीच्या निषेधार्थ भव्य असा मोर्चा विधान भवन ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत



काढण्यात आला.

महिलांना न्याय अधिकार मिळावा, सुरक्षा व सामाजिक शैक्षणिता वाढावी यासाठी विविध मागण्यांचे निवेदन विधान भवन विभागीय आयुक्त,पोलीस आयुक्त,जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.मोर्चाप्रसंगी ॲड. पल्लवी रेगे यांनी राष्ट्रपुरुषांच्या पदस्पर्शाने पावन झालेले व विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्यनगरी महिलांच्या सुरक्षेवर चिंता व्यक्त केली,त्यांनी जागतिक महिला दिन कसा साजरा करायचा असा बेधडक सवाल विभागीय आयुक्त,पोलीस आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना केला.महिलांनी रणरागिनी होऊन अत्याचाराविरुद्ध लढले पाहिजे असे मत मांडले व महिलावर अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करून विविध मागण्यांचे निवेदन विभागीय आयुक्त, पोलिस आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



> "महिलांच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या आपण कायम संतुलन संस्थेच्या पाठीशी उभे राहून सर्वतोपरी सहकार्य करणार आहोत.महिलांच्या न्याय हक्कासाठी कायमच संतुलन शेतकरी कष्टकरी महिला परिषदेच्या अध्यक्ष अँड. पल्लवी रेगे उत्तम काम करीत आहेत."
>
> **— तृप्ती देसाई,** अध्यक्षा-भूमाता ब्रिगेड

> "पुण्यात दिवसेंदिवस स्त्रियांवर अन्याय अत्याचार घटनांमध्ये वाढ होत आहे.त्यामुळे अत्याचार,अन्याय करणाऱ्या नरधामांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.तसेच मुली,महिलांवर अत्याचार अन्याय करणाऱ्यांविरोधात कडक कायदे अमलात आणावे.संतुलन संस्थेचे काम आदर्शवत असून महिलांवर होणाऱ्या अन्याय विरोधात कायमच संतुलन संस्थेच्या माध्यमातून रेगे कुटुंब लढत असते."
>
> **— जयश्री राजेंद्र सातव पाटील,** माजी सरपंच-वाघोली

# निपक्षःपाती न्यायासाठी नीरा बंद

## संतोष देशमुख हत्येतील आरोपीवर कारवाई करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा तसेच दोषी आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येची सखोल चौकशी करण्यात यावी या मागणी साठी शनिवारी (दि.८) नीरा येथे बंद पाळण्यात आला. या वेळी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने नीरा ग्रामपंचायत कार्यालयासमोर निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वधर्मीय ग्रामस्थ उपस्थित होते.

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे शनिवारी ( दि.८) संतोष देशमुख व सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येचा काळ्या फिती लावून निषेध करण्यात आला. यावेळी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होवून ९० दिवस झाले तरी या हत्येप्रकरणातील आरोपीवर कारवाई झाली नाही. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, कृष्णा आंधळे या आरोपीला अटक करण्यात यावी.तसेच सोमनाथ सुर्यवंशीच्या हत्येची सखोल चौकशी करण्यात यावी.

संतोष देशमुख यांच्या हत्येचा खटला सातारा किंवा कोल्हापूरच्या न्यायालयात चालविण्यात यावा अशी मागणी नीरा, पिंपरेखुर्द, गुळूंचे,निंबुत,जेऊर, मांडकी, राख, कर्नलवाडी येथील मराठा क्रांती



नीरा निवेदन: नीरा येथे संतोष देशमुख हत्येप्रकरणी फौजदार सर्जेराव पुजारी यांना निवेदन देताना कार्यकर्ते.

मोर्चाच्या वतीने करण्यात आली. मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने शनिवारी (दि.८) नीरा बंदचे आवाहन करण्यात आले होते. याला प्रतिसाद देत सर्व व्यापारी बंदमध्ये सहभागी झाले होते. अत्यावश्यक सेवा सुरळीत सुरू होत्या. यावेळी निषेध सभेत धनंजय मुंडे, वाल्मिक कराडसह इतर आरोपींच्या फोटोला कार्यकर्त्यांनी जोडे मारून निषेध केला.

यावेळी नीरा दुरक्षेत्राचे फौजदार सर्जेराव पुजारी यांना यावेळी निवेदन देण्यात आले. यावेळी नीरेच्या सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे, ग्रा.पं.सदस्य अनिल चव्हाण, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक तुळशीराम जगताप, मंगेश ढमाळ, सचिन मोरे, महेश जेधे, दयानंद चव्हाण, राजेंद्र काकडे, कांचन निगडे, दिलीप थोपटे, अँड. आदेश गिरमे, दादा गायकवाड, जावेद शेख यांच्यासह सर्वधर्मीय ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी नीरा पोलिसांनी चोख बंदोबस्ता ठेवला होता.

# महिलांनी सांभाळला शिक्रापूर पोलीस स्टेशनचा कारभार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सर्वत्र जागतिक महिला दिन साजरा होत असताना शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे पोलीस स्टेशनचा संपूर्ण कारभार देखील महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी सांभाळला असून आम्ही देखील पुरुषांप्रमाणे कोणत्याही कामात कमी नाही हे यावेळी महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले आहे.

शिक्रापूर ता. शिरूर पोलीस स्टेशन येथे आज जागतिक महिला दिनानिमित्ताने महिला दिनाचे आयोजन करत महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, संदीप साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, महेश डोंगरे, जितेंद्र पानसरे, विजय मस्कर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, तर आज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिणी सोनावले, तर ठाणे अंमलदार म्हणून महिला पोलीस हवालदार उज्वला गायकवाड व किरण निकम यांनी कारभार पहिला असून त्यांना मदतनीस म्हणून रुपाली निंभोरे तर बिनतारी संदेशसाठी शीतल ननवरे, शीतल गवळी यांनी काम पहिले असताना अन्य महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी विविध कामे पाहिली असून या महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी दिवसभर पोलीस स्टेशनचे काम पाहिले.

दरम्यान महिला दिनानिमित्त राष्ट्रवादीच्या महिला तालुकाध्यक्षा आरती भुजबळ, करंदीच्या पोलीस पाटील वंदना साबळे, वाजेवाडीच्या पोलीस पाटील सोनाली वाजे यांनी महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान केला तर यावेळी बोलताना पोलीस स्टेशन मधील आम्हाला नेमून दिलेले सर्वच काम आम्ही प्रामाणिकपणे पार पाडत असतो परंतु आज महिला दिना निमित्ताने विशेष कारभार आमच्याकडे देण्यात आलेला असल्यामुळे आम्हाला वेगळाच आनंद मिळाला असल्याचे यावेळी पोलीस ठाणे अंमलदार उज्वला गायकवाड व किरण निकम यांनी सांगितले.

# ध्येयवेड्या करपे आजीची पिंपळपानावरची चित्रशाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** ध्येय वेड्या करपे आजींची पिंपळ पानांनची चित्र शाळा. 72 साला पासूनचा चित्र संग्रह. आजही पानांवर काढतात चित्र. जेजुरी (विजयकुमार हरिश्चंद्रे ) खरं म्हणजे कलेला वय नसतं ती अमर असती म्हणतात ते खरच असत जगाच्या क्षितिजावर आता महिला भरारी घेताना तारकांन सारखे चमकतं असतात अशाच चमकणाऱ्या जयश्री प्रताप करपे सारख्या74 वर्षीय धय्ये वेड्या आज्जीबाईने 1972 पासून सुरु केलेली घरातील आपली पिंपळ पानांवरची चित्रकला जपून ठेवली आहे विशेषता स्त्री व्यक्तिमत्व असलेले संस्कृती प्रिय चेहरे आपल्या रंगकाला कौशल्याने खूपच सुरेख पणे हाताळत असल्याचे दिसून आले आहे.तसे पहिले तर त्या एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या चेहऱ्याला जन्मापासून असलेले व्यंग एक कान नसलेली मुलगी त्यात एकुलती एक त्यात बापाला तिच्या भवितव्याची काळजी त्यात अनेक आडीअडचणी कठोर पणाने वागवत बापाने मुलीला शिक्षण दिले कां तर ती आपल्या पायावर उभी राहावी म्हणून कसेतरी मॅट्रिक, टायपिंग केल्यानंतर पोटाची खळगी भरण्यासाठी जयश्रीचा प्रवास सुरु झाला असलेले व्यंग यामुळे नोकरीं उपलब्ध झाली नाही वडील स्वतःच रंगकाम करायचे आणि हिने ब्रश घेऊन भिंतीवर आकृत्या रेखटायाच्या रंगा प्रति विलक्षण असणाऱ्या आताच्या आज्जीने आणि त्यावेळच्या चिमुरडीने हळूहळू चित्रे काढण्यासाठी सुरवात केली झाडाखाली गाळालेल्या पिंपळ पानावर



तिनी रेखाटलेल्या आकृत्या बरच काही सांगत असल्याचे एका अभ्यासू कलाकारने ओळखलं आणि भारत फिरायला आलेल्या विदेशी भारतीय वस्तू कला जिथून खरेदी करतात तेथील कंपनीत कामालाही लावले या कंपनीत कागदावर चित्र न काढता जाळी पडलेल्या पानावर चित्र काढण्याचे काम आसल्याने कंपनी सांगेल तशी चित्र रेखाटली जायची स्वातंत्र्य सेनानी पासून इतिहास महापुरुष देवी देवता, प्राणी पशु पक्षी कृष्ण राधिका मीरा युग पुरुष अशा चित्रांना त्या काळात 50 रुपय मिळत. आताच्या काळात 1000 रुपय मिळतात आज मात्र वय झाल्याने लेकी बरोबर जेजुरीत राहतात व कला आपली पुंजी म्हणून जपत असतात.

# माहेरचा आहेर देत शारदानगर शैक्षणिक संकुलात महिला दिन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती संचलित कृषी विज्ञान केंद्र आणि शारदा महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने मागील १७ वर्षे जागतिक महिला दिन साजरा केला जातो या दिवसाचे अवचीत्य साधून यावर्षीही शारदाबाई पवार शैक्षणिक संकुलामध्ये सामाजिक क्षेत्रात असामान्य कार्य करणाऱ्या महिलांचा आत्मविश्वास वाढवा, त्यांच्या कार्यास प्रेरणा मिळावी त्यांच्या कार्याचा गौरव तथा सन्मान व्हावा या हेतूने संस्थेच्या वतीने साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात असामान्य कार्य करणाऱ्या ग्रामीण आणि शहरी महिलांचा संस्थेच्या वतीने शारदा सन्मान पत्र देऊन गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेमध्ये संस्थेच्या विश्वस्त सौ.सुनंदा पवार यांनी सभागृहातील महिला या माहेरपणासाठी आलेल्या आहेत. त्यामुळे शारदानगरमध्ये दिवाळी साजरी करत आहोत असे वाटत असल्याचे म्हटले. देशामध्ये व महाराष्ट्रमध्ये बेरोजगारीचे व महिला अत्याचाराचे प्रमाण वाढते आहे. महिलांमध्ये खूप मोठी ताकद आहे. त्या एका वेळी दहा गोष्टी करू शकतात. स्त्रियांनी स्वतःला सन्मानित करणे गरजेचे आहे.

सत्कारमूर्ती म्हणून इंदुमती कुटे,मलम्मा गोडसे -सोलापूर, नंदिनी जोशी पित्रे डोंबिवली, प्रभादेवी घोघरे-अहमदनगर, अनुराधा भोसले- कोल्हापूर, स्वाती पाध्ये अमरावती, मनसुख शेख कर्जत, लता मासाळ राशीन, ममताबाई भांगरे अहमदनगर, कमल मोटे कर्जत, फातिमा चक्कीवाला पुणे लहूबाई वाघमारे कात्रज, सुरेखा सदाफुले जामखेड, वंदना खेतमाळीस मिरजगाव, रश्मी गंभीर जामखेड संगीता पिंगळे नाशिक, सविता पांडे अहमदनगर, रोहिणी पवार पुणे, राणी नागरगोजे जामखेड, सोनाली पालव मुंबई, जयश्री मोरे बारामती, दीक्षा दिंडे पुणे, अश्विनी कोल्हे जामखेड, आरती गांगर्डे कोपरगाव, रेणुका काले कोपरगाव, वृषाली गुजर पुणे, सिद्धी गावडे सावंतवाडी, गौरी शेळके अरणगाव,लता कोकणे माळशिरस, मंगल धुमाळ शारदानगर, सरल बोराटे जामखेड वृषाली गुजर पुणे या उपस्थित होत्या. या सर्व सत्कारमूर्तींचे औक्षण गुणवंत विद्यार्थिनींनी केले. तसेच त्यांना माहेरचा आहेर साडी-चोळी,सन्मानपत्र व संस्थेचे प्रतीक रोप देऊन त्यांचा सत्कार सौ सुनंदा पवार त्यांच्या हस्ते झाला.

# हिंसाचार रोखण्यासाठी समाजात मूल्ये रुजवा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महिलांना प्रतिमहिना केवळ १५०० रुपये देऊन थांबायचे नाही. तर त्याचा योग्य विनियोग करून महिलांनी व्यावसायिक होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी आम्ही प्रयत्न करू, प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करून कुठल्याही क्षेत्रात महिला मागे राहणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. स्त्रियांना मान देणे हे आपले कर्तव्य आहे. स्त्री- पुरुष भेद करता कामा नये.

येत्या पिढीत स्त्री बाबत सन्मानाची भावना निर्माण करावी लागेल. महिलांवरील हिंसाचार कमी करण्यासाठी समाजात मूल्य रुजवावी लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमवेत राज्यस्तरीय 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' समारोप कार्यक्रमात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाची प्रतिज्ञा घेतली.

'बेटी बचाओ व बेटी पढाओ', या उपक्रमाने स्त्री भ्रूण नष्ट करण्याचे प्रमाण कमी झाले आहे. ज्या जिल्ह्यात विषमता आहे, तिथे मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाही. त्यातून कळते कसा मूर्खपणा आपण करून ठेवला आहे. ज्या जिल्ह्यात मुलींची संख्या कमी आहे, तिथे सुधारणा सुरु केल्या आहेत, असे मुख्यमंत्री बोलताना म्हणाले.



> मी सुद्धा एका मुलीचा बाप आहे. त्यामुळे मला अनुभव येतोय की, मुली या मुलांपेक्षा कशा चांगल्या असतात. महिलांची ही शक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओळखली व सगळ्या संरक्षण क्षेत्रात महिलांना संधी दिली. राजकारणात आता ३३ टक्के महिलांना २०२९ पासून संधी असेल. या देशात महिलांचे राज्य असेल. याचा मला आनंद आहे.
>
> — **देवेंद्र फडणवीस**
> मुख्यमंत्री

# प्लॅटफॉर्मवरील गर्दी नियंत्रणाबाबत मोठा निर्णय

## देशातील ६० मोठ्या रेल्वे स्थानकांवर होणार नियम लागू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**दिल्ली :** भारतीय रेल्वे प्लॅटफॉर्मवरील नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. ज्या प्रवाशांचे तिकीट कन्फर्म झाले आहे, त्यांनाच आता रेल्वे स्थानकावर (प्लॅटफॉर्मवर) प्रवेश दिला जाणार आहे. देशभरातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर हा नवीन नियम लागू केला जाईल. या नियमाची लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे देखील भारतीय रेल्वेने म्हटले आहे.

**या महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर आता नियम**

- - नवी दिल्ली रेल्वे स्थानक (दिल्ली)
- - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई)
- - हावडा जंक्शन (कोलकाता)
- - चेन्नई सेंट्रल (चेन्नई)
- - बेंगळुरू सिटी रेल्वे स्थानक (बेंगळुरू)

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उच्चपदस्थ रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, ज्यामध्ये जास्त पादचाऱ्यांची गर्दी असलेल्या स्थानकांवर गर्दी व्यवस्थापनासाठी कार्यक्षम उपाययोजना केल्या पाहिजेत यावर सहमती झाली. सुट्ट्या आणि सणांच्या काळात भारतीय रेल्वे स्थानकांवर सहसा गर्दी असते. बरेच लोक त्यांच्या नातेवाईकांना सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी रेल्वे स्थानकांवर येतात आणि यामुळे गर्दी वाढते. त्यामुळे रेल्वे स्थानकावरील गर्दी रोखण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हे धोरण लवकरच लागू केले जाईल.

- १) जास्त रेल्वे प्रवासींची गर्दी असलेल्या स्थानकांवर गर्दी व्यवस्थापनासाठी कार्यक्षम उपाययोजना केल्या पाहिजेत



- २) या नवीन धोरणाचे उद्दिष्ट विशेषतः गर्दीच्या हंगामात प्लॅटफॉर्मवरील गर्दी नियंत्रणात आणणे हा आहे.

# महिलांनो पर्समध्ये लाली नको; 'मिरची पूड, चाकू ठेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** महिलांच्या सुरक्षेवर बोलताना, महिलांनी आपल्या पर्समध्ये लाली पावडर न ठेवता मिरचीची पूड व चाकू ठेवायला हवा असे आवाहन वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी केलं होतं. यावरुन त्यावेळी विरोधकांनी त्यांच्यावर टीका केली होती. मात्र, महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना पाहता आता खरोखर बाळासाहेब म्हणाले होते तसे करण्याची वेळ महिलांवर आल्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे.

जळगावात महिला दिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले, आज महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या वाढत्या घटना पाहता महिलांनी वाघीण झाले पाहिजे. आजची नारी अबला न राहता ती सबला झाली पाहीजे. आज मॉलची संस्कृती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे महिला बचत गटांसाठी महानगरपालिकेने मॉलची व्यवस्था करावी तसेच जे गाळे निर्माण करण्यात येतील त्यातील पाच टक्के गाळे बचत गटांना देण्यात याव्यात.





> महिलांनी पर्समध्ये लाली पावडर न ठेवता चाकू व मिरची ठेवायला हवे असे जेव्हा वंदनीय बाळासाहेब ठाकरे म्हणाले तेव्हा विरोधकांनी त्यांच्यावर टीका केली होती. मात्र, आज खरोखर वेळ तशी आहे. महिलांवर अत्याचार होत आहेत. त्याला कुठेतरी आळा बसला पाहिजे. महिलांचे आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे महिलांनी आत्महत्या न करता त्यावर उपाय शोधावा टोकाची भूमिका घेऊ नये.
>
> — **गुलाबराव पाटील**
> -पाणीपुरवठा मंत्री

# डोनाल्ड ट्रम्प यांचा रशियाला झटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अमेरिका :** टॅरिफ (आयात शुल्क) वरून सुरु असलेल्या ट्रेड वॉरदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठा दावा केला आहे. अमेरिकेतून निर्यात वस्तूंवर भारताने शुल्क कमी करण्यास सहमती दर्शविली असल्याची माहिती ट्रम्प यांनी शुक्रवारी दिली. दुसरीकडे त्यांनी रशियाला झटका दिला. आता अमेरिका रशियावर शुल्क लागू करेल, अशी घोषणा त्यांनी केली. तर सर्वाधिक शुल्क आकारणाऱ्या देशांवरही त्यांनी जोरदार टीकास्त्र सोडले. भारत आमच्याकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतो. तुम्ही भारतात काहीही विकू शकत नाही. तेथे काही निर्बंध आहेत. त्यांनी आता त्यांचे शुल्क खूपच कमी करण्यास सहमती दर्शविली आहे," असे त्यांनी व्हाईट हाऊसमध्ये बोलताना सांगितले.



मुंबई **सन्मान 'ती' च्या कार्याचा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन, मुंबई येथे, जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय 'बेटी बचाओ - बेटी पढाओ' दशकपुर्ती समारोप कार्यक्रमात, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० महिलांचा सन्मान केला.

# कलेच्या माध्यमातून मासिक पाळीबाबत जनजागृती




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'उजास' आणि पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट व स्वयंसेवकांच्या सहकार्याने १६ ते २५ वयोगटातील सुमारे एक हजार तरूणींना मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करणाऱ्या वॉल पेंटिंग उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. मासिक पाळीशी संबंधित मिथक आणि गैरसमजांना आव्हान देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम 'उजास'च्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असलेल्या प्रयासांचा भाग आहे.

'उजास' हा आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अद्वैतेश बिर्ला यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणारा उपक्रम आहे. पुण्याच्या आजूबाजूच्या ग्रामीण आणि निमशहरी भागात विविध क्षेत्रात प्रगती झाली असली तरी मासिक पाळीशी संबंधित गैरसमज प्रचलित आहेत. त्यामुळे मुलींमध्ये शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढत आहे. मासिक पाळीबाबतच्या आरोग्यविषयक जागरुकतेचा अभाव, कलंक आणि सॅनिटरी प्रॉडक्ट्सच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे भारतात दरवर्षी सुमारे २३ दशलक्ष मुली शाळा सोडतात, असे संशोधनात आढळले आहे. विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी कॉलेजच्या बाहेरील भिंतींचे रूपांतर परिवर्तनासाठीच्या कॅनव्हासमध्ये करत मासिक पाळीबद्दलचे मौन भंग करण्यासाठी आणि खुल्या संभाषणांना वाव देण्यासाठी एक साधन म्हणून कलेचा वापर केला.

- १) मासिक पाळीबाबत अभावाशी सामना करण्यासाठी ४६,७१,९०० सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करून ती ४,३२,३२१ किशोरवयीन मुली, महिला आणि तरुण मुलांपर्यंत पोहोचली.
- २) एकट्या पुण्यात 'उजास'ने १५,५९३ हून अधिक विद्यार्थिनींना प्रभावित केले आहे.
- ३) चुकीची माहिती आणि सांस्कृतिक कलंक मासिक पाळीच्या आरोग्यविषयक संवादात अडथळे आणत असल्याने अशा प्रकारच्या हस्तक्षेपांची नितांत गरज आहे.

> "मासिक पाळीबाबतच्या गैरसमज आणि निर्बंधांमुळे असंख्य मुली बंधनात पडतात व त्यामुळे त्यांची क्षमता आणि संधी मर्यादित होतात. हे चक्र मोडून काढण्यासाठी आपण उद्याचे चेंजमेकर असलेल्या तरुणांपासून सुरुवात केली पाहिजे.
>
> — **अद्वैतेश बिर्ला** संस्थापक, उजास



## कामगार सेनेतील २५० शिवसैनिकांची घरवापसी

**मुंबई :** मुंबईतील पंचतारांकित कोर्टयाड मेरीट हॉटेलमधील २५० कर्मचारी सहा महिन्यांपूर्वी भारतीय कामगार सेनेला जय महाराष्ट्र करत त्यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या राष्ट्रीय कर्मचारी सेनेत प्रवेश केला होता. मात्र, कामगारांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे म्हणून पुन्हा ठाकरेंच्या भारतीय कामगार सेनेत प्रवेश केला आहे. विनायक राऊत, शैलेश परब आणि युनिट प्रमुख रुपेश कदम यांच्या नेतृत्वात उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत २५० कर्मचाऱ्यांनी पुन्हा पक्षप्रवेश केला आहे.



## धावत्या मिक्सर ट्रकचे ब्रेक फेल

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील पुणे लिंक रोडवर आज सकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास एक भीषण अपघात झाला. मिक्सर ट्रक बुडालींक रोड कडून चक्की नाक्याच्या दिशेने जात होता. याच दरम्यान, मिक्सर ट्रक चा ब्रेकफेल झाल्याने त्याचे नियंत्रण सुटले. या ट्रकने रस्त्यावरून जाणाऱ्या तीन ते चार रिक्षांना तसेच एका छोट्या टेम्पोला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की टेम्पो आणि रिक्षांचा अक्षरशः चक्काचूर झाला. टेम्पो चालक टेम्पोमध्ये अडकून होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी, अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले. अर्ध्या तासाच्या प्रयत्नानंतर रक्तबंबाळ टेम्पो चालकाला बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन रिक्षाचालकांसह दोन प्रवासी जखमी झाले.



## चारचाकींसाठी लवकरच नवीन मालिका

**पुणे :** चारचाकी खासगी वाहनांसाठी लवकरच सुरू होणाऱ्या नवीन एमएफ मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता तसेच उर्वरित क्रमांकासाठी आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) ११ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयात पत्त्याचा पुरावा (टेलिफोन बील), आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करणे आवश्यक राहील. सदर डीडी डी.वाय. आर.टी.ओ. पिंपरी चिंचवड यांच्या नावे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेचा पुणे येथील असावा. एकाच क्रमांकाकरिता जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात येईल.



## आईसक्रिममध्ये चक्क विषारी साप ?

**थायलंड :** उन्हाळा तोंडावर असताना आईस्क्रिमचा असा फोटो व्हायरल होतो आहे जो पाहून आईस्क्रिम खायची की नाही असा प्रश्न पडला आहे. आता उन्हाळा सुरू होईल. उन्हाळा आणि आईस्क्रिम हे एक समीकरणच आहे. सध्या पॅकेटबंद खाद्यपदार्थांमध्ये अनेक चित्रविचित्र वस्तू सापडत आहेत. आता एका आईस्क्रिममध्ये चक्क एक छोटा साप आढळला आहेत. काही महिन्यांपूर्वी आईस्क्रिममध्ये माणसाचं तुटलेलं बोट सापडल्याने एकच खळबळ उडाली होती. आता पुन्हा आईस्क्रिममध्ये असं काही सापडलं आहे की लोक घाबरले आहेत.

एका चॉकलेट बार आईस्क्रिममध्ये गोठलेल्या अवस्थेत हा साप होता. एका व्यक्तिने फेसबुक पोस्ट करत याचे फोटो शेअर केले आहेत. थायलंडमधील रॅचबुरी विभागात ही खळबळजनक घटना घडली आहे. रेबॅन नॅकलेंबुन असे या फेसबुक युजर्सचे नाव आहे. त्या माणसाने सांगितले की त्याने ते ब्लॅक बीन आईस्क्रीम बारमधून विकत घेतले होते. जेव्हा त्याने ते खाण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते दृश्य पाहून तो आश्चर्यचकित झाला. मात्र, भीतीपोटी आईस्क्रीम फेकून देण्याऐवजी त्या माणसाने त्याचा फोटो काढला आणि सोशल मीडियावर शेअर केला.

## त्याचा आम्हाला मोठा धोका : गॅरी स्टेड

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड संघात रविवारी (९ मार्च) खेळवला जाणार आहे. हा सामना दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. याआधी हे दोन संघ साखळी फेरीत आमने-सामने आले होते. त्यात न्यूझीलंडला भारताने पराभवाचा धक्का दिला होता. आता अंतिम सामन्यात पुन्हा भिडण्यासाठी हे दोन संघ सज्ज आहेत. या सामन्यापूर्वी न्यूझीलंडचे प्रशिक्षक गॅरी स्टेड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी यावेळी न्यूझीलंड कोणत्या भारतीय खेळाडूपासून सर्वाधिक धोका आहे, हे देखील सांगितले आहे. साखळी फेरीत न्यूझीलंडविरुद्ध भारताचा फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने ५ विकेट्स घेतल्या होत्या. ते म्हणाले, 'तो खरंच चांगला गोलंदाज आहे. त्याने चांगली गोलंदाजी केली. आता एकदा खेळपट्टीही कशी आहे, ते पाहू आणि त्याचा खेळावर काय परिणाम होऊ शकतो, ते पाहू. गेल्या सामन्यात त्याने आमच्याविरुद्ध ४२ धावांत ५ विकेट्स घेतल्या होत्या. त्यामुळे तो अंतिम सामन्यातही खेळेल, अशी अपेक्षा आहे. त्यानंतर आम्ही त्यानुसार योजना आखू.'

# आज फायनलचा महासंग्राम

## कसे असेल दुबईतील हवामान अन् खेळपट्टी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**दुबई :** भारतीय संघ उद्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील फायनलचा सामना खेळणार आहे. दुबईतील आंतरराष्ट्रीय मैदानावर भारत व न्यूझीलंड संघांदरम्यान हा महासंग्राम रंगणार आहे. एकीकडे दुबईच्या मैदानावर सलग ४ सामने जिंकणारा भारतीय संघ आहे. तर दुसरीकडे याच मैदानावर भारताकडून पराभव स्वीकारलेला न्यूझीलंड संघ आहे. भारताने या मैदानात जास्त सामने खेळले असले, तरी दुबईतील खेळपट्टी व हवामान सारखे बदलत असते. त्यामुळे रविवारी हवामान व खेळपट्टी कशी असेल हे जाणून घेऊयात.

हायब्रीड मॉडेलमुळे भारतीय संघाचे सर्व सामने दुबईत खेळवण्याचा आयसीसीने निर्णय घेतला. स्पर्धेत सर्वात आधी भारताने बांगलादेशवर सहज विजय मिळवला. त्यानंतर यजमान पाकिस्तानला भारताने पराभवाची धुळ चारली. साखळी सामन्यातील अंतिम फेरीत भारताने न्यूझीलंडला पराभूत केले होते आणि सेमीफायनलमध्ये भारताने ऑस्ट्रेलियाला स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवला. आता भारतीय संघ स्पर्धेत दुसऱ्यांदा न्यूझीलंडविरूद्ध भिडणार आहे.

हायब्रीड मॉडेलमुळे भारतीय संघाचे सर्व सामने दुबईत खेळवण्याचा आयसीसीने निर्णय घेतला. स्पर्धेत सर्वात आधी भारताने बांगलादेशवर सहज विजय मिळवला. त्यानंतर यजमान पाकिस्तानला भारताने पराभवाची धुळ चारली. साखळी सामन्यातील अंतिम फेरीत भारताने न्यूझीलंडला पराभूत केले होते आणि सेमीफायनलमध्ये भारताने ऑस्ट्रेलियाला स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवला. आता भारतीय संघ स्पर्धेत दुसऱ्यांदा न्यूझीलंडविरूद्ध भिडणार आहे.

आत्तापर्यंत झालेल्या सामन्यांमधील परिस्थितीनुसार दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावरील खेळपट्टी ही संथ आहे. सामन्याच्या सुरूवातील वेगवान गोलंदाजांना मदत होते व त्यांना सुरूवातीच्या षटकांमध्ये विकेट्स मिळू शकतात. पण जसजसा सामना पुढे जाईल तशी खेळपट्टी संथ होते. ज्यामुळे फिरकीपटूंना विकेट्स घेण्याची संधी निर्माण होते.

**गोल्डन बॅट :** इंग्लंडचा फलंदाज बेन डकेट २७ धावांसह चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये प्रथम स्थानी आहे. स्पर्धेत २ शतकांसह २२६ धावा करणारा न्यूझीलंडचा फलंदाज रचिन रविंद्र यादीत दुसऱ्या स्थानी आहे. इंग्लंडच्या जो रूटने एकूण २२५ धावा केल्या आहेत. तर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली २१७ धावांसह यादीत ४ स्थानी आहे. त्यामुळे गोल्डन बॅटसाठी फायनल खेळणाऱ्या विराट कोहली व रचिन रविंद्रमध्ये स्पर्धा पाहायला मिळणार आहे.

**गोल्डन बॉल :** चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये न्यूझीलंडचे २ व भारताचे २ गोलंदाज आहेत. भारताविरूद्ध ५ विकेट्स घेणारा मॅट हेन्री यादीत १० विकेट्सह प्रथम स्थानी आहे. तर बांगलादेशविरूद्ध ५ विकेट्स घेणारा भारतीय वेगवान गोलंदाज ८ विकेट्ससह दुसऱ्या स्थानी आहे. त्याचबरोबर वरूण चक्रवर्थी व मिचेल सँटनर यांनी स्पर्धेत प्रत्येकी ७ विकेट्स घेतले आहेत.

## रोहितने खेळपट्टीवर टिकणे आवश्यक!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** भारताचा कर्णधार रोहित शर्मा गुणी फलंदाज आहे. त्याने खेळपट्टीवर टिकून राहून मोठी खेळी करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याची खेळपट्टीवरील उपस्थिती भारतासाठी खूप प्रभाव पाडू शकते असे मत भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय कर्णधार रोहितने वेगवान सुरुवात करण्याचा दृष्टिकोन अवलंबला आहे. पण, या प्रयत्नांत तो अनेकदा लवकर बाद झाला आहे. त्याने वेगवान पवित्रा घेण्यात चूक काहीच नाही. पण, संघाचे हित लक्षात घेता त्याने खेळपट्टीवर अधिक वेळ टिकणे महत्त्वाचे आहे, असे गावस्कर यांनी म्हटले आहे.

रोहितने २५ षटके फलंदाजी केली, तर भारताची धावसंख्या १८० ते २०० च्या घरात येईल. तेव्हा जर दोनच गडी बाद झाले असतील तर, अशा वेळी भारत ३५० च्या आसपास मजल निश्चित मारू शकेल, असे गावस्कर यांनी नमूद केले. "वेगवान फलंदाजी करणे हा एक भाग झाला. पण, त्याने अशा वेळी स्वत:ला अधिक काळ खेळपट्टीवर टिकून राहण्यासाठी थोडा संयम बाळगण्याची गरज आहे.

## सायकलच्या 'चाकावर' नकारात्मता भिरकावणारी कोल्हापूरची पूजा!

**नवी दिल्ली :** कोल्हापूर, म्हटलं की सर्वांना आठवतो तो ऐतिहासिक वारसा आणि कुस्ती. पण याच मल्लांच्या भूमीत वाढलेल्या लेकीने



सायकलविश्वात कोल्हापूर अन् महाराष्ट्राचं नाव अटकेपार पोहोचवलं आहे. घरात कुस्तीचं वातावरण अन् शेतकऱ्याची मुलगी पूजा दानोळे ऑलिम्पिकमध्ये भारताचं नाव गाजवण्याचं स्वप्न पाहात आहे. नुकत्याच पार पडलेल्या खेलो इंडियामध्ये तिने पदकांची हॅटट्रिक साजरी केली. तिने २०२०च्या खेलो इंडियामध्ये ४ सुवर्ण आणि १ कांस्य पदक मिळवली होती. १५ एप्रिलला २००४ रोजी जन्मलेल्या पूजासाठी हा प्रवास सोपा नव्हता, पण तिच्या या स्वप्नांना बळ देण्यासाठी आई-वडील खंबीरपणे तिच्या पाठिशी उभे राहिले. तिचा हाच प्रवास सकाळ उलगडला आहे. 'मी आधी स्विमिंग करायचे, माझे वडील कुस्ती खेळायचे. त्यामुळे घरात खेळाचं वातावरण होते. सायकलिंग करायचं असं काही मी ठरलं नव्हतं. एक दिवस शाळेतल्या शिक्षकांनी मला सायकलिंग करण्यास सांगितले.' 'त्यानंतर आम्ही एका स्पर्धेसाठी गेलो, तिथे मला पदक मिळालं. त्यानंतर मग मी तालुका, जिल्हास्तरीय अशा स्पर्धांमध्ये सहभागी झाले. त्यावेळी मग ठरवलं की सायकलिंगमध्येच करियर करायचं. त्यानंतर दीपाली पाटील मॅडमने मला बालेवाडीत प्रवेश घेण्यासाठी बोलावलं.

## शूटिंग स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलची उत्कृष्ट कामगिरी



**पुणे :** शिरूर येथील शूटिंग स्पोर्टस क्लब मध्ये झालेल्या स्पर्धेत नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या प्रतिभावना नेमबाजांनी अविश्वसनीय १४ पदकांवर नाव कोरले आहे. त्यात ३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश आहे. तसेच अंडर १४ मुलीमध्ये स्वरा गुरूवाले, आणि अंडर १९ मुलीमध्ये कंगन सिंग व अंडर १७ मुलांमध्ये अर्थव सिंह भादोरिया यांनी एअर पिस्तूल प्रकारातील यश धक्कादायक आहे. यांनी अनुक्रमे ३२७/४००, ३२५/४०० व ३७१/४०० गुण मिळवून सुवर्ण पदक पटकावले. ध्रुव ग्लोबल स्कूल ला मिळालेल्या या यशाबद्दल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी आणि प्रिन्सिपल संगीता राऊतजी यांनी सर्वांन शुभेच्छा दिल्या. नेमबाजी स्पर्धेत अंडर १४ पीपी sight एअर रायफल मध्ये हर्षवर्धन शर्मा (रौप्य), विहान पाटील (कांस्य) तर अंडर १७ पीप Sight एअर रायफल मध्ये कुशान पांडे (रौप्य), तनिष कन्सारा (कांस्य) पदकावर नाव कोरले. तसेच अंडर १४ एअर पिस्तूल मध्ये आदित्य गोडसे (रौप्य) व अर्णव चवन (कांस्य) आणि अंडर १७ एअर पिस्तूल मध्ये अर्थव सिंह भादोरिया (सुवर्ण) व शौर्या डुलकर (रौप्य) यांनी पदकावर शिक्कामोर्तब केला. अंडर १९ एअर पिस्तूल मध्ये प्रमत झा (कांस्य) व अंडर १४ एअर पिस्तूल मुलीमध्ये स्वरा गुरूवाले (सुवर्ण) व शौर्या थोरवे (रौप्य), अंडर १७ एअर पिस्तूल मुलीमध्ये अनन्या मिस्त्री (रौप्य) आणि अंडर १९ एअर पिस्तूल मुलीमध्ये कंगन सिंग (सुवर्ण पदक) व त्रिशा सावंत (रौप्य) यांनी पदक मिळविले. या खेळाडूंना प्रशिक्षक अश्विनी गुंजाल, सोनाली परेराव, संध्या फडतर यांनी प्रशिक्षण दिले. या खेळाडूंना सहाय्यक क्रीडा समन्वयक रोहित पाटील आणि क्रीडा विभाग प्रमुख दत्तात्रय काठे यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरले.

## भारत-इराण आशियाई 'क्विन' होण्यासाठी भिडणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इराणमधील तेहरान येथे आशियाई महिला कबड्डी अजिंक्यपद २०२५ स्पर्धा सुरू आहे. गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या या स्पर्धेत भारतीय महिला संघाने दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात यश मिळवलं आहे. भारतीय संघ या स्पर्धेत गतविजेता म्हणून उतरला होता. त्यामुळे गतविजेत्याला साजेशी कामगिरी त्यांनी केली आहे. शुक्रवारी या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या लढती पार पडल्या. पहिल्या उपांत्य फेरीत भारतासमोर नेपाळचे आव्हान होते. भारतीय महिलांनी हा उपांत्य सामना ५६-१८ अशा फरकाने एकतर्फी जिंकला आणि अंतिम सामना गाठला.

आता शनिवारी (८ मार्च) जागतिक महिला दिनी भारतीय महिला विजेतेपदासाठी अंतिम सामन्यात खेळतील. अंतिम सामन्यात सोनाली शिंगटेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय महिला संघासमोर इराणचे तगडे आव्हान असणार आहे.

इराण संघाने शुक्रवारी दुसऱ्या उपांत्य सामन्यात बांगलादेशवर ४१-१८ अशा फरकाने एकतर्फी मात केली. त्यामुळे आता अंतिम सामन्यात भारत आणि इराण या स्पर्धेतील यशस्वी दोन संघांमध्ये लढत होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी १२ वाजता अंतिम सामना सुरू होईल.

भारत आणि इराण हे दोन्ही संघ साखळी फेरीनंतर आपापल्या ग्रुपमध्ये अव्वल स्थानी राहिले होते. भारताने बांगलादेश, थायलंड आणि मलेशियाला पराभूत केले होते.

## मुंबई इंडियन्सला मोठा धक्का; जसप्रीत बुमराह आयपीएल २०२५ ला मुकणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** इंडियन प्रिमिअर लीग अवघ्या काही दिवसांवर आली आहे. फ्रँचायझींनी आपल्या आपल्या प्रॅक्टीस कॅम्प्सला देखील सुरूवात केली आहे. यावेळी सर्वच संघात मोठे बदल झाले आहेत. त्यामुळे या आयपीएल हंगामाची चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. पण अशाच मुंबई इंडियन्स संघाच्या चाहत्यांसाठी निराशाजनक बातमी समोर येत आहे. मुंबई संघाचा प्रमुख गोलंदाज जस्प्रीत बुमराह आयपीएलला मुकण्याची शक्यता असल्याचे समजत आहे.

बुमराह वर्षाच्या सुरूवातीपासून मैदानाबाहेर आहे. त्याला बॉर्डर गावस्कर ट्रॉफी दरम्यान उद्भवलेल्या पाठीच्या दुखण्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेला मुकावे लागले आहे. बुमराहने ऑस्ट्रेलियाविरूद्ध संपूर्ण मालिकेत उत्तम कामगिरी केली. दोन सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व देखील केले. पण अंतिम सामन्यात तो अचानक मैदानाबाहेर गेला. त्यावेळीपासून भारतीय चाहत्यांची बुमराहबद्दलची चिंता वाढली आणि अखेर चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेला त्याला मकावे लागले.

चॅम्पियन्स ट्रॉफीतून माघार घेतल्यानंतर बुमराहने बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (NCA) येथे त्याच्या पुनर्वसन प्रक्रिया करत आहे. बुमराह वर्कआऊट करताना देखील पाहायला मिळाला. त्यानंतर बुमराह २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या भारत पाकिस्तान सामन्याला दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावर बुमराहने उपस्थिती लावली होती. आता बुमराह पुन्हा सरावकडे वळला आहे. त्याने नेट्समध्ये गोलंदाजी करताना व्हिडीओ देखील सोशल मीडियावर शेअर केला होता.

TOI च्या वृत्तानुसार जस्प्रीत बुमपाह मुंबई संघात एप्रिल महिन्यात सामिल होणार असून तो सुरूवातीच्या दोन आठवड्यांना मुकण्याची शक्यता आहे." बुमराहचे मेडिकल रिपोर्ट्स चांगले आहेत. त्याने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये गोलंदाजी सुरू केली आहे. पण तो आयपीएलच्या सुरूवातीला अनुपस्थित राहाण्याची शक्यता आहे. सध्याच्या परिस्थितीनुसार, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात तो पुनरागमन करण्याची शक्यता आहे." बीसीसीआय सुत्राने सांगितले.

"त्यामुळे बुमराह आयपीएलमधील सुरूवातीच्या ३ किंवा ४ सामन्यांना मुकण्याची शक्यता आहे. बुमराहने अद्याप संपुर्ण लयमध्ये गोलंदाजी करण्यास सुरुवात केलेली नाही. वैद्यकीय टीम हळूहळू त्याच्या कामाचा भार आणि तीव्रता वाढवेल. जोपर्यंत तो काही दिवस लयमध्ये गोलंदाजी करू शकत नाही, तोपर्यंत वैद्यकीय पथक त्याला गोलंदाजीची अनुमती देण्याची करण्याची शक्यता नाही," सूत्राने सांगितले.

## रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत एकुण १४० खेळाडू सहभागी



**पुणे :** नॉलेज बेस अकादमी यांच्या वतीने आयोजित केबीएज पहिल्या महिला व विविध वयोगटातील रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत जिल्ह्यातून एकुण १४० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा इचलकरंजी हॉल, महर्षी स्त्रीशिक्षण संस्था, कर्वेनगर पुणे येथे रविवार, ९ मार्च २०२५ रोजी होणार आहे. स्पर्धेच्या संचालिका आयए श्रद्धा विंचवेकर यांनी सांगितले की, हि स्पर्धा पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेखाली होत आहे. तसेच, हि स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेत १४० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा सहा गटात होणार असून यामध्ये केविन डिसुझा(१९०४), आशी दलाल(१७०४), वेदांत काळे(१६८३), भुवन शितोळे(१६७१), शर्विन बडवे(१६६१) यांचा समावेश आहे. हि स्पर्धा (८ वर्षाखालील), (१० वर्षाखालील), (१२ वर्षाखालील), (१५ वर्षाखालील), पुरुष गट आणि महिला गट अशा गटात ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेत एकूण ४०,०००/-रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी गायत्री कुलकर्णी आणि नितीन उंडाळे हे आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी आयए श्रद्धा विंचवेकर (९९७५७४७००८) यांच्याशी संपर्क साधावा. सहभागी महिला खेळाडूंना विशेष भेटवस्तू देखील देण्यात येणार आहेत.

## कोहलीला 'विराट' विक्रम करायची संधी; ४६ धावा आणि होणार रेकॉर्ड




**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना उद्या दुबईमध्ये खेळला जाणार आहे. भारत विरुद्ध न्यूझीलंड या महामुकाबल्यामध्ये भारताचे पारडे जड असल्याचे म्हटले जात आहे. उद्याच्या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीला नवा विक्रम करण्याची मोठी संधी आहे. जर त्याने अंतिम सामन्यामध्ये ४६ धावा केल्या, तर विराट इतिहास रचेल.

ख्रिस गेलच्या नावावर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात सर्वाधिक धावा या विक्रमाची नोंद आहे. तो चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये १७ सामने खेळला आहे.

त्याने तीन शतकं आणि एका अर्धशतकाच्या मदतीने ७९१ धावा केल्या आहेत. भारत विरुद्ध न्यूझीलंड सामन्यात फक्त ४६ धावा केल्यास विराट कोहली ख्रिस गेलचा रेकॉर्ड मोडेल. याशिवाय विराट कोहली हा चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात सर्वात जास्त धावा करणारा फलंदाज बनेल.

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया या उपांत्य फेरीच्या सामन्यामध्ये विराटने शिखर धवनचा ७०१ धावांचा विक्रम मोडला होता. तो चॅम्पियन्स ट्रॉफीमधला भारताचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला. विराटला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज हा विक्रम करण्याची देखील संधी आहे. सध्या सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराट चौथ्या क्रमांकावर आहे. त्याने ४ सामन्यांमध्ये २१७ धावा केल्या आहेत.

## जिंकण्यासाठी चांगले क्रिकेट खेळणे गरजेचे! : सितांशु कोटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** एकाच मैदानावर खेळायला मिळाल्यामुळे भारताला फायदा झाला या टिकेत अर्थ नाही. जिंकण्यासाठी खेळपट्टीचे स्वरुप किंवा परिस्थिती महत्वाची नसती, तर तुम्हाला चांगले क्रिकेट खेळावे लागते, असे मत भारताचे फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी व्यक्त केले. चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत रविवारी भारत आणि न्यूझीलंड दरम्यान अंतिम सामना होणार आहे. सामन्यापूर्वीच्या शुक्रवारच्या सराव सत्रानंतर पत्रकार परिषदेत बोलताना कोटक यांनी या सगळ्या चर्चा भारताने जिंकण्यास सुरुवात केल्यानंतरच सुरू झाल्या याकडे लक्ष वेधले.

"खेळपट्टीच्या स्वरुपामुळे आम्हाला काय फायदा झाला हे समजत नाही. आम्ही जिंकल्यानंतर या चर्चेला सुरुवात झाली. यावर काय बोलायचे ते कळत नाही. खेळपट्टीचे स्वरुप आणि परिस्थिती काहीही असो, तुम्हाला जिंकायचे असेल, तर चांगले क्रिकेट खेळणे आवश्यक असते,"असे कोटक म्हणाले.

"तुम्ही जर चांगले क्रिकेट खेळला नाही, तर तुम्हाला तक्रारी करता येत नाही. जिंकल्यावर त्या संघाला फायदा झाला हे बोलण्यातही काही अर्थ नाही. आम्ही फक्त येथे सराव करतो आणि खेळतो म्हणून आम्हाला फायदा झाला असे मला वाटत नाही. आम्ही चांगले क्रिकेट खेळलो हेच सत्य आहे."

## भारताचा प्रणव वर्ल्ड चॅम्पियन्स; बुद्धिबळाच्या पटावर ऐतिहासिक कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताच्या प्रणव व्यंकटेश याने शुक्रवारी बुद्धिबळाच्या पटावर ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने जागतिक ज्युनियर बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत विजेता होण्याचा मान संपादन केला. प्रणव व्यंकटेश व स्लोवेनियाचा मॅटिच लेवरेनसिच यांच्यामधील अखेरच्या फेरीचा सामना ड्रॉ राहिला. मोटेनेग्रो येथे ही स्पर्धा पार पडली.

प्रणव व्यंकटेश याने मागील वर्षी चेन्नई आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकताना शानदार कामगिरी केली होती. ज्युनियर जागतिक स्पर्धेत त्याने आपले झंझावाती प्रदर्शन कायम ठेवले. या संपूर्ण स्पर्धेत त्याला एकाही लढतीत पराभवाला सामोरे जावे लागले नाही.

प्रणव व्यंकटेश याने अकरापैकी सात सामन्यांमध्ये विजयाला गवसणी घातली. चार सामन्यांमध्ये त्याला ड्रॉचा सामना करावा लागला. त्याने या स्पर्धेमध्ये एकूण नऊ गुणांची कमाई करीत जेतेपदावर मोहर उमटवली.

भारताच्या अरविंद चिंदमबरम याने प्राग मास्टर्स स्पर्धेच्या अजिंक्यपदावर हक्क सांगितला. त्यामुळे भारतीय संघासाठी आजचा दिवस दुहेरी यश मिळवणारा ठरला.

प्रणव व्यंकटेश याची बुद्धिबळातील सुरुवात दमदार झाली होती. वेस्टब्रिज आनंद चेस अकादमीसाठी त्याची निवड झाली. आपल्या शिष्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी कामगिरी केल्यानंतर स्वत: विश्वनाथन आनंद यांनी त्याचे अभिनंदन केले.

### दिल्लीच्या पराभवाचं जास्त दु:ख आरसबीला

## हर्लिनची बॅट तळपली, गुजरातचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बंगलुरू :** वूमन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धा आता अखेरच्या टप्प्यात आहे. या स्पर्धेतील १७ वा सामना सामना गुजरात जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स संघात शुक्रवारी लखनौमध्ये खेळला गेला. या सामन्यात गुजरात जायंट्स संघाने ५ विकेट्सने विजय मिळवला आहे.दिल्लीने यापूर्वीच या स्पर्धेच्या प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आहे. हा दिल्लीचा अखेरचा साखळी सामना होता. त्यांनी १० गुण मिळवले आहेत. पण प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्यासाठी गुजरातसाठी हा विजय अत्यंत महत्त्वाचा होता. गुजरातने विजय मिळवल्याने त्यांचे आता ७ सामन्यात ८ गुण झाले असून त्यांनी गुणतालिकेत दिल्लीपाठोपाठ दुसरे स्थान मिळवले असून मुंबई इंडियन्सला मागे टाकले आहे. गुजरातला अद्याप एक सामना आणि मुंबईचे दोन साखळी सामने बाकी आहेत.

दरम्यान, गुजरातच्या या विजयामुळे युपी वॉरियर्सचे आव्हान या स्पर्धेतील संपले, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूलाही मोठा धक्का बसला आहे. कारण बंगळुरूचे ४ गुण अद्याप असून त्यांचे दोन सामने बाकी आहेत. आता गुजरातच्या विजयामुळे त्यांना प्लेऑफसाठी उर्वरित दोन्ही सामने जिंकावेच लागणार आहे, याशिवाय दुसऱ्या संघांच्या निकालावरही अवलंबून रहावे लागेल.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने गुजरात जायंट्ससमोर १७८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग गुजरातने १९.३ षटकात ५ विकेट्स गमावत पूर्ण केला. गुजरातकडून हर्लिन देओलने शानदार अर्धशतकी खेळी साकारली.

गुजरातकडून बेथ मुनी आणि दयालन हेमलता यांनी डावाची सुरुवात केली होती. पण हेमलता दुसऱ्याच षटकात १ धावेवर बाद झाली. तिला शिखा पांडेने मेग लॅनिंगच्या हातून झेलबाद केले. पण त्यानंतर हर्लिन देओलने बेथ मुनीला चांगली साथ दिली. त्यांच्यात अर्धशतकी भागीदारीही झाली.

#रा